वर्ष १० वें अंक २ रा

२४ नोव्हेंबर १९५८

# संजीवन

जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संजीवन कार्यालय, श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी – २

## २० ऑक्टोबर १९५८

(दुर्गा – पूजा)

माझे आशीर्वाद :

हृदयावरील अहंकाराचा छाप पुसून टाका आणि त्याची जागा श्रीमातेच्या प्रेमाला घेऊं दे. स्वत:च्या कल्पना व निर्णय याविषयींचा सर्व आग्रह मनांतून काढून टाका, म्हणजे मातेला जाणण्याची बोधशक्ति तुम्हांला येईल. स्वत:ची इच्छा, कृतींतील अहं–प्रेरणा, वैयक्तिक अधिकाराची अभिलाषा, वैयक्तिक पसंती–नापसंतीविषयीं आसक्ति यांच्या आहारीं जाऊं नका, म्हणजे मग श्रीमातेची शक्ति तुमच्या ठिकाणीं सुस्पष्टपणें कार्य करूं शकेल आणि तुम्ही मागत असलेलें अक्षय्य सामर्थ्य तुम्हांस मिळेल व तुमची सेवा सर्वांगपूर्ण होईल.

–– श्रीअरविंद

## २२ ऑक्टोबर १९५८

(विजया – दशमी)

विजय म्हणजे अज्ञानाच्या बंधनांतून मुक्त होऊन शेवटीं देहधारी चेतनेचा या पृथ्वीवर झालेला उदय. युगानुयुगें आध्यात्मिक विकासद्वारां याचीच तयारी करावयाची होती. अर्थातच भूतकालांतील सर्व दीर्घकालीन आध्यात्मिक प्रयत्न व अनुभव हे आजपर्यंत चालत आलेल्या पूर्वतयारीच्या कार्याचेच परिणाम होत. तें कार्य अशा एका अवस्थेस येऊन पोहोंचलें आहे कीं, अंतिम सिद्धीकरतां प्रयत्न करणें आतां शक्य झालें आहे.

–– श्रीअरविंद

SABCL : Vol 26 : Page 451

वर्ष १० अंक २ रा

२४ नोव्हेंबर १९५८

# संजीवन

## जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संपादकः

भालचंद्र लिमये

**संजीवन कार्यालय**

श्रीअरविन्द आश्रम, पाँडीचेरी

# २७ आक्टोबर १९५८


(महालक्ष्मी-पूजा)

..... जेथें जेथें ती आपले चरण दाबते तेथून चित्तोन्मादक आनंदाचे अद्‌भुत स्रोत वाहूं लागतात.

SABCL : Vol 25 : Page 31

तिच्या चरणस्पर्शानें दुःखपूर्ण जीवनस्पंदाच्या वेदना दूर व्हाव्या म्हणून सर्व प्रकृति मुग्ध-भावानें केवळ तिलाच आवाहन करीत असते.

—श्रीअरविंद



## २४ नोव्हेंबर १९५८

असतो मा सद्गमय।
तमसो मा ज्योतिर्गमय।
मृत्योर्माऽमृतं गमय॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

(उपनिषद्)

तथास्तु

Sri Aurobindo

असत् पासून मला सत्‌कडे ने,
अंधःकारापासून प्रकाशाकडे ने,
मृत्यूपासून अमरत्वाकडे ने.
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

( उपनिषद् )

तथास्तु

—श्रीअरविंद

# अनुक्रमणिका


| | विषय | | पान |
|---|---|---|---|
| १ | प्रार्थना आणि ध्यान | श्रीमाताजी. | ५ |
| २ | मातृवाणी | श्रीमाताजी. | ७ |
| ३ | भारताच्या गतकालीन अवनतीची मीमांसा | श्रीअरविन्द. | १३ |
| ४ | अचूक निर्णय (विद्यार्थ्यांसाठीं) | श्रीमाताजी. | १९ |
| ५ | श्रीमाताजींचीं प्रवचनें | श्रीमाताजी. | २४ |
| | १ जननिंदा | | २४ |
| | २ शारीरिक दुःखावर मानसिक उपाय | | २५ |
| | ३ जीवनाचें रहस्य | | २७ |
| ६ | मैत्रेयी—एक प्रतीक | गजराज. | २९ |
| ७ | अडचणीमध्यें असतांना | श्रीअरविन्द. | ३१ |
| ८ | श्रीअरविन्द वाङमय | मा. पुं. पंडित. | ३४ |
| ९ | वाचकांचे प्रश्न | रेवान्. | ३७ |
| १० | साहित्य-सत्कार | | ४१ |
| ११ | साधकांना पत्रें | श्रीअरविन्द. | ४४ |

वर्ष १० अंक २ रा २४ नोव्हेंबर १९५८


# संजीवन


**तमसापलीकडील उच्चतर ज्योति पहात,**
**देवतांमधील दिव्य सूर्याप्रत, सर्वोच्च ज्योतिप्रत आम्ही आलो.**

**ऋग्वेद–१. ५०. १०**

---

## प्रार्थना आणि ध्यान

७ फेब्रुवारी १९१४

जी व्यक्ति तुझ्याशीं सर्वांगांनीं तादात्म्य पावलेली आहे आणि त्यामुळें, विशिष्ट परिस्थितीमध्यें कशाच्या साह्यानें तुझा सर्वोत्तम आविष्कार कर्मामध्यें साधतां येईल ह्याची जिला सतत जाणीव आहे, त्या व्यक्तीला कोणत्याच बाह्य विधि-नियमांची आवश्यकता नाहीं. ज्यांना तुझी महति अजून कळलेली नाहीं, अशा अज्ञ लोकांच्या अज्ञानाचा शक्य तेवढ्या प्रमाणांत परिहार करण्याचें साधन–किंवा ज्यांना तुझ्याशीं केवळ मधूनमधूनच एकरूप होतां येतें, त्यांच्यांत, उरलेल्या अंधःकारमय व गोंधळलेल्या काळांत साह्य करण्याचें साधन–हेंच खरें शेवटीं जीवनाच्या सर्व नियमांचें वास्तविक स्वरूप असतें.

आपणां स्वतःकरितां कांहीं नियम ठरविणें व ते शक्यतितके लवचिक म्हणजेच परिस्थितिप्रमाणें बदलून घेतां येतील असे ठरविणें केव्हांहि चांगलेंच; पण त्यावेळीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, तुझ्याशीं तादात्म्यानें लाभणारा खरा, सहज व तेजःपूर्ण प्रकाश उपलब्ध नसतांनाच फक्त वापरण्याचे, कृत्रिम प्रकाशासारखे हे नियम आहेत. शिवाय, त्या नियमांचें वरचेवर पुनरावलोकन करणेंहि अत्यावश्यक आहे. कारण ते नियम म्हणजे आपल्या वर्तमान ज्ञानाचेच आविष्कार असणार. अर्थात् आपल्या ज्ञानांत जसजशी भर पडेल व जसजशी प्रगति होईल तसतसें या नियमांचें स्वरूपहि साहजिकच बदललें पाहिजे.

जे कोणी आमच्याकडे येतील त्यांच्या प्रगतीला अपाय न व्हावा, येवढेंच नव्हे तर,

त्यांच्या सर्वोत्तम कल्याणार्थ आमचे अधिकाधिक प्रयत्न व्हावेत--म्हणजेच त्यांच्याठिकाणीं तुझें वास्तव्य असल्याचा परम शोध त्यांना लागावा--यासाठीं आमची काय भूमिका असावी याविषयीं चिंतन करीत असतां मला असें वाटलें कीं, तुझ्या नियमनाशीं जुळवून घेऊं शकेल, उपयोगी होईल असा कोणताच इतका व्यापक व नमनीय नियम नाहीं. खरा एकच मार्ग म्हणजे तुझ्याशीं सतत संलग्न रहावयाचें; म्हणजे मग अनंत प्रकारांनीं व रूपांनीं येणाऱ्या भिन्नभिन्न परिस्थितीस संपूर्णतया जुळवून घेणारा मार्ग आम्हांस लाभूं शकेल.

CWMCE Vol 01 : Page 67

*

८ फेब्रुवारी १९१४.

हे प्रभो, प्रेममय स्वामी ! आम्हीं 'चैतन्याविषयीं जागृत व्हावें म्हणून तूं आम्हांस अंधःकारांतून वर उचलतोस, तुझ्या सनातन शांतीमध्यें आम्हाला तुझा संस्पर्श व्हावा, एका-त्मता लाभावी यासाठीं दुःखांतून तूं आम्हाला सोडवितोस. प्रतिदिनीं प्रातःकालीं माझी आर्त अभीप्सा उत्कंठेनें तुजप्रत येते आणि मी तुला प्रार्थना करते कीं, तुजविषयींच्या ज्ञानानें माझे अखिल अस्तित्व जागृत होऊं दे, तुझ्याचमुळें, तुझ्याचमध्यें आणि तुझ्याच करितां केवळ मला जगतां येऊं दे. अधिकाधिक पूर्णभावानें माझें तुझ्याशीं तादात्म्य होऊन माझ्या प्रत्येक शब्दांत व कृतींत केवळ तुझाच आविष्कार होऊं दे. जे जे कोणी आमच्याकडे येतात व ज्यांच्याशीं आम्ही संबंधित आहों त्यांना तुझ्या दिव्य सान्निध्याची व सर्वोच्च नियमनाची अनुभूति येऊन त्यायोगें त्या सर्वांमध्यें निश्चित स्वरूपाचें परिवर्तन घडूं दे, अशी माझी तुला प्रार्थना आहे. प्रभो, या पृथ्वीवरील सर्व मानवांस, कठोर दुःखयातना भोगत असतांनाहि, तुझ्या प्रकाशांतून व प्रेमांतून उद्‌भूत होणारें खरेंखुरें समाधान व तुझ्या दिव्य शांतीचा अद्‌भुत सांत्वनपर आनंद अनुभवावयास मिळूं दे; मी प्रार्थितें कीं, वस्तुमात्रांतील अणूरेणूंमध्यें तुझ्या दिव्य सर्वोच्च सामर्थ्याचा संचार अधिकाधिक होत जाऊन त्यायोगें अंध अज्ञानाचा तुझ्याशीं असलेला विरोधभाव कमीकमी होत जाऊं दे. अशारीतीनें समस्त अज्ञानावर विजय मिळवून तुझ्याकडून जगाचें सर्वांगीण व निश्चित स्वरूपाचें परिवर्तन घडो. या तापक्लेशमय व संघर्षमय जगाचे सुसंवादमय आणि शांततामय जगांत रूपांतर होऊं दे......

म्हणजे त्यायोगें तुझ्याच नियमनाची येथें परिपूर्ति होईल.

CWMCE Vol 01 : Page 68

★

१७ फेब्रुवारी १९१४.

हे प्रभो ! किती उत्कंठेनें माझी अभीप्सा तुजप्रत वर येत आहे; तुझा निर्णय तोच आमचा निर्णय व्हावा, आमचें जीवन संपूर्णतया तुझ्या सेवेसाठीं समर्पिलें जावें आणि तुझ्या स्फूर्तीचें व अधिकांत अधिक शक्य अशा आविष्काराचें रूप, आमच्या जीवनास यावें याकरितां तुझ्या सर्वोच्च नियमनाचें पूर्ण भान आम्हास प्रदान कर आणि तुझी इच्छा काय आहे याचें सतत आकलन आम्हाला होत राहूं दे.

हे प्रभो ! सर्व अंधःकार व अंधत्व दूर कर आणि तुझ्या दिव्य ज्योतिप्रकाशानें प्राप्त होणारी सुनिश्चित नीरवता प्रत्येकास लाभेल असें कर. --श्रीमाताजी.

CWMCE Vol 01 : Page 77

# मातृवाणी

**प्रश्नः**—योगमार्गावर कोणते धोके असतात ? विशेषतः पाश्चिमात्य लोकांना योग हा धोक्याचा असतो काय ? कोणीतरी म्हटलें आहे कीं, योगमार्ग हा पौर्वात्यांना योग्य असूं शकेल परंतु पाश्चिमात्यांच्या मनाचा समतोल बिघडविण्यास तो कारणीभूत होतो.

**उत्तरः**— योग हा पूर्वेकडील लोकांपेक्षां पाश्चिमात्यांना अधिक धोक्याचा असतो असें नाहीं. ज्या मनोवृत्तीनें तुम्ही योगमार्गाकडे वळतां तीवर सारें कांहीं अवलंबून आहे. स्वतःकरतां, वैयक्तिक हेतु साध्य करण्यासाठीं जर तुम्हांला योग आचरण्याची इच्छा असेल तर तो संकटमय व धोक्याचा ठरतो. उलट, पावित्र्याच्या भावनेनें तुम्ही योगमार्ग स्वीकारलांत, भगवंताचा शोध हें योगाचें ध्येय आहे हें लक्षांत ठेवून योग केलांत, तर तुम्हांला योगमार्ग कंटकमय भासणार नाहीं, तर सुतराम् सुरक्षित असा प्रत्ययास येईल.

भगवत्कार्य सिद्ध व्हावें म्हणून नव्हे तर, सामर्थ्य संपादन करावें, योगाच्या मिषानें कांहीं महत्त्वाकांक्षा परिपूर्त कराव्या या उद्देशानें जेव्हां लोक योगमार्गाचा स्वीकार करतात तेव्हां संकटें व अडचणी ओढवतात. तुमची महत्त्वाकांक्षा सुटत नसेल तर योगाला स्पर्शसुद्धां करूं नका. तो अग्नि आहे. सावध रहा, नाहींतर चटका बसेल.

योगाचे दोन मार्ग आहेत. एक तपस्येचा मार्ग आणि दुसरा समर्पणाचा. तपस्येचा मार्ग अत्यंत खडतर असतो. याठिकाणीं तुम्ही सारी भिस्त केवळ स्वतःवर ठेवून चालत असतां, स्वतःच्या बळावर मार्ग आक्रमण करीत असतां. तुमच्या शक्तीच्या मानानें तुम्ही मार्गक्रमण करतां आणि त्या प्रमाणांत यश संपादन करतां. पण या मार्गामध्यें अधःपात होण्याचा नेहमींच संभव असतो; आणि एकदां कां अधःपात झाला कीं जणुं कोलमडून तुम्ही खोल गर्तेंत पडतां, तेथून वर यायला जवळजवळ उपाय नसतोच म्हटलें तरी चालेल. दुसरा समर्पणाचा मार्ग बिनधोक आणि खात्रीचा असतो; परंतु या बाबतींत मात्र पाश्चिमात्यांना अडचण भासते. कारण त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याला ज्यामुळें धक्का बसेल असें कांहींहि आलें तर तें टाळण्याचें, त्याला भिण्याचें त्यांना शिक्षणच मिळालेलें असतें. व्यक्तिमत्त्वाच्या भावनेचें त्यांना बाळकडूच मिळालेलें असतें; आणि समर्पण म्हणजे तर ह्या सर्वांचा त्याग. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर, श्रीरामकृष्ण म्हणत असत त्याप्रमाणें, वानराच्या पिलाचा किंवा मांजराच्या पिलाचा, एक कोणतातरी मार्ग तुम्हांस अनुसरतां येईल. आपल्याला इकडे तिकडे घेऊन जावें म्हणून वानराचें पिलुं आपल्या आईस अगदीं घट्ट धरून रहातें, असें घट्ट धरलें नाहीं तर त्याची पक्कड सुटते आणि तें खालीं पडतें. उलट, मांजरीचें पिलूं आईला कधींच पकडून बसत नाहीं; मांजरीच त्याला धरते. त्यामुळें त्याला कसलीच भीति नाहीं कीं जबाबदारी नाहीं. आईला धरूं देणें आणि म्याँ, म्याँ असें ओरडणें यापेक्षां दुसरें कांहींच त्याला करावयाचें नसतें.

तुम्हीं जर समर्पणाचा मार्ग संपूर्णतया आणि अंतःकरणापासून प्रामाणिकपणें स्वीकारलात तर कसलेंच भय अथवा कसलीहि अडचण रहाणार नाहीं. प्रश्न आहे तो प्रामाणिकपणाचा, तळमळीचा. तळमळ, प्रामाणिकपणा नसेल तर योगसाधनेस प्रारंभ करूं नका. तुम्ही जर मानवी व्यवहार करीत असतां तर त्यामध्यें लबाडी करतां आली असती. पण ज्या योगमार्गांत भगवंताशीं संबंध यावयाचा तेथें कोठेंहि असत्यास—खोटेपणास वाव असणें शक्य नाहीं. तुम्ही जर पूर्णपणें मनमोकळे आणि खुले असाल——ईश्वर-साक्षात्कार आणि ईश्वरप्राप्ति हेंच जर तुमचें प्राप्तव्य असेल आणि ईश्वरानें तुम्हांस चालवावें असें जर तुमचें एकमेव ध्येय असेल तर तुम्हाला योगमार्गावर बिनधोकपणें प्रगति करतां येईल.

आणखी एक धोका आहे तो कामवासनेसंबंधींचा. योगांतील शुद्धीकरणाच्या प्रक्रियेमध्यें सर्व अव्यक्त विकार आणि वासना तुमच्याठिकाणीं उघड्या पडतात, तळांतून पृष्ठभागावर येतात. यासाठीं तुम्हीं एक शिकायला हवें; तुम्हीं या गोष्टी दडवून ठेवतां कामां नये किंवा त्यांच्याकडे दुर्लक्षहि करतां कामां नये. तुम्हीं त्यांना तोंड दिलें पाहिजे. त्यांवर विजय मिळवून त्यांना नवीन आकार द्यावयास पाहिजे. म्हणून योगाचा पहिला परिणाम असा होतो कीं, मनाच्या साह्यानें प्रस्थापित केलेल्या संयमाचें उच्चाटन होतें; दडून बसलेले वासना-विकार एकाएकीं मोकळे होतात, वर उसळून येतात आणि व्यक्तीवर आक्रमण करतात. हा मनाचा संयम सुटल्यानंतर त्याच्याजागीं जोंवर भगवंताची सत्ता प्रस्थापित झालेली नसते तोंवरचा काळ हा एक संक्रमणावस्थेचा काळ असतो; या कालावधींत तुमची अंतःकरणपूर्वकता आणि तुमचें समर्पण यांची कसोटीच असते. कामवासना किंवा तत्सम प्रवृत्ती बळावण्याचें सामान्यतः कारण असें असतें कीं, लोक त्यावर विशेष लक्ष देतात; अतिरिक्त आवेशानें या प्रवृत्तींविषयीं ते विरोध दाखवितात. जुलुम जबरदस्तीनें व निग्रहानें त्यांना कह्यांत आणण्याचा प्रयत्न करतात. त्यांचा कोंडमारा करून त्यांना आंवरून धरतात. तथापि एकाद्या गोष्टीवर तुम्ही जितका अधिक विचार करूं लागतां आणि 'मला ती नको' 'मला ती नको' असें म्हणूं लागतां, तितक्या प्रमाणांत अधिक अधिक तुम्ही त्या गोष्टीनें जखडले जातां. त्याऐवजीं ती गोष्ट स्वतःपासून दूर ठेवा, तिच्याशीं असलेला पूर्वपरिचय तोडून टाका; तिच्याकडे शक्य-तितकें कमी लक्ष द्या, आणि तीविषयीं विचार येऊं लागले तर त्या बाबतींत उदासीन आणि निर्लिप्त रहा.

योगशक्तीचें कार्य चालूं असतांना तिच्या दाबामुळें साधकाच्या स्वभावांतील ज्या इच्छा आणि वासना वर उफाळून येतात त्यांना अनासक्त आणि स्थिरवृत्तीनें तोंड दिलें पाहिजे. असें समजलें पाहिजे कीं, या गोष्टी तुमच्याशीं विजातीय वस्तू आहेत, किंवा त्या बाह्य जग-तांतील वस्तू असल्यानें त्यांच्याशीं तुमचा कांहीं संबंध नाहीं. त्या प्रवृत्ती आणि वासना भगवंतास समर्पण करून टाकाव्यात म्हणजे भगवंत त्यांना हातीं घेऊन त्यांचें परिवर्तन करून टाकील.

भगवन्तापुढें तुम्हीं स्वतःला एकदां खुलें केलेंत, भगवंताची शक्ति तुमच्यामध्यें एकदां प्रविष्ट झाली आणि तरीहि जर तुम्ही आपल्या स्वभावांतील जुन्याच वळणांना चिकटून राह-ण्याचा प्रयत्न करीत असलांत, तर तुम्ही स्वतःच त्रास, अडचणी आणि संकटें यांना बोलाविणें

केल्यासारखें तें होईल. स्वतःच्या वासनांची तृप्ति करण्यासाठीं तर तुम्हीं साधनेचा बुरखा घेतलेला नाहीं ना, हें तुम्हीं जागृत राहून पाहिलें पाहिजे. आपणांस 'गुरू' म्हणवून घेणारी अनेक माणसें असतात आणि त्यांचा तेवढाच उद्योग असतो. या दृष्टीनें साधना घेतली म्हणजे भगवन्ताकडे नेणाऱ्या साधनेच्या सरळ मार्गावरून तुम्ही च्युत होतां. तुमच्याजवळ जेव्हां योग-मार्गाचें ज्ञान अत्यल्प असतें आणि सामर्थ्य मात्र तितकें नसतें, तेव्हां तुम्ही विशिष्ट योनींच्या तावडींत सांपडतां, त्यांच्या हातांतील अगतिक अशीं बाहुलीं बनतां आणि अखेरीस संपूर्णपणें त्यांच्या भक्ष्यस्थानीं पडतां. म्हणून लक्ष्यांत असूं द्या कीं, जेथें जेथें ढोंग असतें तेथें तेथें संकट ठेवलेलेंच असतें. ईश्वरास तुम्ही फसवूं शकणार नाहीं. तुमचा असा बेत असतो कीं, वरून देवाला म्हणायचें, 'देवा ! मला तुझ्याशीं एकरूप होऊन जायचें आहे' आणि आंत मात्र त्याचा अर्थ असा असायचा कीं, 'मला शक्ति आणि सुखें हवींत.' सावध रहा ! असें असेल तर तुमचीं पावलें कडेलोटाच्या मार्गावर पडत आहेत. पण अशा साऱ्या संकटांतूनहि सुखरूप सुट-ण्याचा मार्ग आहे. बाल व्हा. जगन्मातेच्या स्वाधीन व्हा. ती तुम्हाला ज्या मार्गानें नेईल त्या मार्गानें तिला नेऊं द्या. हें केलेंत म्हणजे संकटें मुळींच रहाणार नाहींत.

अर्थात् याचा अर्थ असा नाहीं कीं, तुम्हाला अन्य प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावें लागणारच नाहीं अथवा मार्गावर कांहीं विघ्नें आड येणार नाहींत आणि त्यांच्याशीं झगडून तुम्हाला विजय मिळवावा लागणार नाहीं. असाहि अर्थ नाहीं कीं, समर्पण केलें म्हणजे विना-आयास विना-कष्ट आणि अखंडित अशा प्रगतीचा परवाना तुम्हाला मिळाला ! कारण उघड आहे; तुमच्या ठिकाणीं अजून एकत्व प्रस्थापित झालेलें नाहीं; तुमचें समर्पणसुद्धां अजून अनन्य आणि परिपूर्ण नाहीं. सुरुवातीला तुमच्यांतील एकादाच भाग समर्पण करतो. आज एक भाग तर उद्यां दुसरा, अशी समर्पणाची तऱ्हा असते. भिन्न भिन्न दिशांना वळलेले सारे भाग एकत्र आणून त्या सर्वांचें मिळून एक अभिन्न एकत्व निर्माण करणें हें तर योग-साधनेच्या साऱ्या खटाटोपाचें उद्दिष्ट आहे. हें जोंपर्यंत सिद्ध झालें नाहीं तोंपर्यंत संदेह, निराशा, विमनस्कता, मन द्विधा होणें अशा प्रकारच्या तरी अडचणी साधनेंत येणारच. सारें वातावरणच, सारें जगच मुळीं दूषित आहे. प्रत्येक श्वासाबरोबर जणुं तुम्ही तें आंत घेत असतां. अनिष्ट स्वभावाच्या एकाद्या व्यक्तीशीं थोडीशी देवाण-घेवाण केलीत, इतकेंच नव्हे तर, अशी व्यक्ति जरी केवळ तुमच्या अंगावरून गेली तरीसुद्धां तीपासून संसर्गबाधा होण्याचा संभव असतो. ग्रंथिज्वराचा कहर असलेल्या ठिकाणाच्या जवळ तुम्ही अगदीं न कळत जरी गेलांत तरी रोगबाधा होण्यास तेवढेंहि पुरेसें आहे. जें कांहीं मिळवायला कित्येक महिने खर्ची पडले तें सारें कांहीं थोड्या निमिषांच्या अवधींतहि तुम्ही गमावून बसूं शकतां. जोंवर तुम्ही एक सामान्य मानवी प्राणी म्हणून जीवन जगतां, जोंवर तुम्ही सर्वसाधारण जीवन कंठीत असतां, तोंवर इतर अगदींच संसारी व्यक्तींशीं मिसळून तुम्ही व्यवहार केलात तरी फारसें बिघडत नाहीं; पण जर कां तुम्हाला दिव्य-जीवन जगावयाचें असेल तर मात्र आपली संगत आणि भोंवतालची परिस्थिति यांविषयीं तुम्हाला कमालीची काळजी घ्यावयाला पाहिजे.

**प्रश्नः—**आपल्या अस्तित्वामध्यें एकता (unity) व एकजिनसीपणा (homogeneity) प्रस्थापित करण्याचा मार्ग कोणता ?

**उत्तरः—**इच्छाशक्ति दृढ ठवा. आज्ञाभंग करणाऱ्या मुलाशीं जसें तुम्ही वागतां तसें तुमच्या ठिकाणच्या प्रतिकूल भागांशीं वागा. पुनः पुनः धिमेपणानें त्यांच्यावर परिणाम करा. त्यांची चूक त्यांच्याच लक्ष्यांत येऊं द्या.

तुमच्या जाणिवेच्या खोल खोल भागांत चैत्यपुरुषाचें स्थान आहे; तुमच्या अंतरंगांतील भगवंताचें मंदिर तें हेंच. तुमच्या ठिकाणच्या विभिन्न, परस्परविरोधी हालचालींचें एकत्रीकरण याच केंद्राभोंवतीं घडून यावयास हवें. एकदां तुम्हांस चैत्यपुरुषाचें भान झालें व चैत्यपुरुषाची अभीप्सा प्राप्त झाली कीं, साऱ्या शंका आणि अडचणी नष्ट करतां येतात; यास कमी-अधिक वेळ लागेल इतकेंच. तरीपण अखेरीस यश निश्चित आहे. "मला तुझें व्हायचें आहे," असें म्हणून तुम्ही एकदां भगवन्ताकडे वळलांत आणि भगवन्तानें त्यावर 'होय' म्हटलें म्हणजे मग सारें जग जरी आडवें आलें तरी त्याला तुम्हाला भगवन्तापासून दूर करतां येणार नाहीं. तुमच्या आंतरात्म्यानें (The central being) एकदां समर्पण करून टाकलें म्हणजे मुख्य अडचण दूर झाली. बाह्य अस्तित्व (The outer being) हें एकाद्या पापुद्र्याप्रमाणें असतें. सामान्य जनांमध्यें हा पापुद्रा इतका कठीण असतो कीं, त्यामुळें त्यांना त्यांच्यामधील भगवन्ताच्या अस्तित्वाची जाणीव नसते. एक क्षण कां होईना, आंतरात्म्यानें (The inner being) "हा मी येथें आहे; आतां मी तुझाच आहे", असें म्हटलें म्हणजे एक सेतु बांधला जातो, बाह्य पापुद्रा, बाह्य कवच, हळू हळु अधिक अधिक पातळ होत जाऊन दोन्ही भाग, आन्तरात्मा व बाह्य अस्तित्व, हीं दोन्ही जोडलीं जातात, एकच बनून जातात.

महत्त्वाकांक्षेनें अनेक योग्यांचा नाश झालेला आहे. ही कीड कित्येकदां दीर्घकाळपर्यंत समजून येत नाहीं. अनेक लोक योगमार्ग स्वीकारतात त्यावेळीं त्यांना त्याची जाणीव नसते. पण एकदां कां त्यांना शक्ती मिळूं लागल्या कीं मग त्यांची महत्त्वाकांक्षा जागी होते; अधिकच जोरानें वर येते; कारण प्रारंभीच महत्त्वाकांक्षा काढून टाकलेली नसते.

एका योग्याची अशीच गोष्ट आहे. योगाच्या साह्यानें त्यानें अद्भुत शक्ती संपादन केल्या होत्या. एकदां एका मोठ्या मेजवानीस त्याच्या शिष्यांनीं त्याला आमंत्रण केलें होतें. बैठ्या टेबलासमोर भोजनाची व्यवस्था करण्यांत आली होती. गुरुजीनीं आपली शक्ति कोठल्या-तरी रीतीनें दाखवावी म्हणून शिष्यांनीं विनंति केली. आपण हें करतां कामां नये, हें तो जाणून होता; पण त्याच्या ठिकाणीं महत्त्वाकांक्षेचें बीज होतें. "कांहीं झाले तरी ही एक साधी निरुपद्रवी गोष्ट आहे. अशा गोष्टी शक्य असतात हेंहि त्यामुळें सिद्ध होईल आणि ईश्वराचें थोरपणहि त्यांना समजून येईल," असा मनाशीं विचार करून तो म्हणाला, "टेबल काढून घ्या; पण फक्त टेबलच; त्यावरील कापड व वर ठेवलेलीं भांडीं हलवूं नका." शिष्य उद्गारले, "छेः हें घडणें शक्य नाहीं. मग सारेंच जमिनीवर पडेल ना !" पण त्यानें आग्रह धरला तेव्हां शिष्यांनीं कापडाखालून टेबल काढून घेतलें; आणि आश्चर्य असें कीं, तें कापड आणि सर्व भोजनपात्रें जशींच्या तशींच, जणूं टेबल खालीं असल्यासारखींच, राहिलीं. शिष्य थक्क

झाले. पण इकडे आसनावरून गुरू एकाएकी उठले, आणि "यापुढें शिष्य म्हणून कधीं मी करणार नाहीं. पुनः कधीं कधीं नाहीं. हाय ! हाय ! माझ्या देवाशीं मीं बेइमानी केली !" असें उद्‌गारत किंकाळया फोडत तेथून निघून धांवत सुटले. त्याचें हृदय पोळून निघालें. कारण योगमार्गानें प्राप्त झालेल्या दिव्य शक्तींचा उपयोग त्यानें स्वार्थी बुद्धीनें केला होता.

योगमार्गानें प्राप्त झालेल्या शक्तींचें प्रदर्शन करणें केव्हांहि चूकच आहे. याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, अशा तऱ्हेच्या शक्ती निरर्थक असतात. परंतु त्या जशा मिळाल्या असतील तशाच उपयोगांत आणल्या म्हणजे झालें. भगवन्ताशीं संयुक्त झाल्यानें अशा शक्ती प्राप्त होतात; म्हणून भगवदिच्छेनुसारच त्यांचा उपयोग करावयास पाहिजे, प्रदर्शनासाठीं नाहीं. समजा, एकादा आंधळा मनुष्य तुम्हाला भेटला आणि त्याला 'दृष्टि' देण्याची शक्ति तुमच्यांत आहे; त्याला दृष्टि यावी अशी जर भगवंताची इच्छा असेल तर, "त्याला दृष्टि येवो" असें तुम्हीं म्हणतांच त्याला डोळयांनीं दिसूं लागेल. परंतु केवळ त्याला बरें वाटण्याच्या इच्छेनें तुम्हीं त्याला दृष्टि देण्याचा प्रयत्न केलांत तर स्वतःची महत्त्वाकांक्षा तृप्त करण्याकरितांच शक्तीचा उपयोग तुम्हीं केलांत असें होईल. अशा तऱ्हेच्या अनेक प्रसंगीं असें घडतें कीं, तुमची स्वतःची शक्ति तर नष्ट होतेच, पण तुम्ही त्या व्यक्तीच्या अंतर्गत जीवनांतहि मोठाच अडथळा निर्माण करतां. दोनहि प्रयोग जरी दिसण्यांत एकच भासले तरी, एकांत भगवदिच्छा प्रेरक असते तर दुसऱ्यांत कांहीं वैयक्तिक हेतु साध्य करण्याची प्रवृत्ति असते.

यावर असा प्रश्न उपस्थित होतो कीं, कार्यप्रवृत्त करणारी प्रेरणा ही भगवदिच्छाच आहे हें कसें ओळखावयाचें ? भगवदिच्छा ओळखणें तितकेंसें कठीण नाहीं. ती अचूक ओळखतां येते. योगमार्गांत फारशी प्रगति झाली नसतांहि भगवदिच्छा जाणून घेतां येणें शक्य असतें. केवळ एकच गोष्ट करावयास हवी— भगवदिच्छा व्यक्त करणारा जो शब्द स्वतांच्या हृदय-स्थानापासून उठतो तो अत्यंत मंद शब्द लक्ष्यपूर्वक ऐकला पाहिजे. एकदां हा आंतरिक संदेश लक्ष्यपूर्वक ऐकण्याची संवय झाली म्हणजे मग भगवदिच्छेच्या प्रतिकूल तुमच्या हांतून जरा कांहीं घडूं लागलें तर एक प्रकारच्या अस्वस्थतेचा तुम्हांस अनुभव येईल. त्या चुकीच्या मार्गावर हट्टानें चालत रहाल तर तुम्ही अधिकच बेचैन होऊन जाल. परंतु तुम्हाला वाट-णाऱ्या अस्वस्थतेचें कारण म्हणून जर कां एकादी भौतिक सबब पुढें करून चुकीच्याच मार्गानें जाऊं लागाल तर ही योग्यायोग्य जाणण्याची शक्ति लोप पावूं लागेल आणि मग शेवटीं त्याचा असा परिणाम होईल कीं, हांतून हरतऱ्हेच्या गैरगोष्टी घडूनहि तुम्हांला यत्किंचित् देखील अस्वस्थता वाटणार नाहीं. परंतु पहिल्यांदाच तुम्हाला जेव्हां केव्हां लवमात्रहि अस्वस्थता वाटेल तेव्हां थबकून, "कशामुळें असें वाटतें ?" असा जर प्रश्न तुमच्या अंतःकरणाला तुम्हीं केला तर खरें, योग्य उत्तर तुम्हांला मिळेलच; आणि सारें कांहीं सुस्पष्ट होऊन जाईल. थोडीशी उदासीनता किंवा अस्वस्थता वाटली तर त्यासाठीं बाह्य भौतिक सबब शोधून काढूं नका. अशा प्रसंगीं थांबून कारण शोधून काढण्याकरितां तुम्ही विचार कराल तेव्हां त्यामागें हृदयाचा सरळपणा आणि मनःपूर्वकता असूं दे. प्रथमतः मनाकडून, वर वर खरें वाटेल असें एकादें सुंदर स्पष्टीकरण पुढें मांडलें जाईल; पण तें मानूं नका. तें बाजूला टाकून पुढें चला,

व विचार करा "या अस्वस्थेतेमागें काय आहें ? असें कां होत आहे ?" मग तुमच्या आंत एकाद्या कोंपऱ्यामध्यें छपून बसलेला एकादा छोटासा तरंग—तुमच्या वृत्तीस मिळालेलें किंचित् अनिष्ट वळण, वक्रता—उघडकीस येईल. हेंच तुमच्या त्रासाचें किंवा अस्वस्थतेचें कारण असेल.

मानवतेची सेवा करण्याचा विचार हा एक महत्त्वाकांक्षेचा अतिसार्वत्रिक प्रकार आहे. अशा तऱ्हेच्या सेवेविषयीं किंवा कार्याविषयीं कोणत्याहि प्रकारची आसक्ति असेल तर तें एक व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेचें लक्षण आहे. जो गुरू असें मानतो कीं, मानव जातीला एका महान् सत्यधर्माची शिकवण आपल्याला द्यावयाची आहे, ज्याला असें वाटतें कीं, आपल्याला अनेक शिष्य लाभावेत, शिष्य सोडून गेले म्हणजे ज्याचें मन दुःखित होतें किंवा जो भेटेल त्याला शिष्य बनविण्याचा ज्याचा प्रयत्न असतो, तो केवळ आपल्या महत्त्वाकांक्षेचीच परिपूर्ति करण्यास झटत असतो, दुसरें कांहींहि नाहीं, हें स्पष्ट आहे. परमेश्वराचा आदेश अनुसरण्याची तयारी असेल तर जें कांहीं काम दिलें असेल—मग तें काम कदाचित् प्रचंडहि असेल—तें स्वीकारण्याची तयारी हवी आणि जेवढ्या शांतचित्तानें तें हातीं घेतलें असेल तेवढ्याच शांतवृत्तीनें, वेळ आली तर दुसऱ्या दिवशीं तें सोडून देण्याची तयारी पाहिजे. काम संपविण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे अशी भावनाहि तुमच्या मनांत न येतां, कामापासून दूर होण्याची पात्रता तुमच्या अंगीं असली पाहिजे. तुम्हांला मुळींच आसक्ति असतां कामा नये. एकाद्या वस्तूविषयीं किंवा विशिष्ट जीवन रहाटीविषयींहि तुम्हीं संपूर्णतया मुक्त असलें पाहिजे. योग्याची खरी भूमिका जर अंगीं बाणवून घ्यावयाची असेल तर भगवन्ताकडून जें जें येईल तें तें सारें स्वीकारण्यास तुम्हीं समर्थ असलें पाहिजे आणि तसेंच, सोडतांनाहि तें अगदीं सहजपणें, दुःख-खेद न वाटूं देतां सोडतां आलें पाहिजे. "मला कांहींहि नको" असें म्हणणारा बैरागी आणि "मला हें हवें, तें हवें" असें म्हणणारा सामान्य संसारी मनुष्य या दोघांची वृत्ति एकच असते. असें असणें शक्य आहे कीं, सामान्य संसारी मनुष्याची स्वामित्व भावनेवर जितकी आसक्ति असेल तितकीच वैरागी मनुष्याची त्यागवृत्तीवर असूं शकेल.

भगवन्ताकडून येतील त्या साऱ्या गोष्टी, साऱ्या घटना स्वीकारल्या पाहिजेत. भगवंताकडून येतील त्याच असें म्हणणयाचें कारण हें कीं, सुप्त वासनांकडूनहि कांहीं गोष्टी येण्याची शक्याता असते. वासनांचें कार्य सुप्त मनांत, मनाच्या अवचेतन भागांत चालतें; आणि तेथूनहि कांहीं गोष्टी तुमच्याकडे येतात. त्या वासनांच्याकडून आलेल्या आहेत असें जरी तुम्हांला कळलें नाहीं तरी भगवंताकडून त्या आलेल्या नसतात; तर आवरण घेतलेल्या वासनांकडूनच त्या आलेल्या असतात.

भगवंताकडून जेव्हां एकादी गोष्ट येते तेव्हां ती सहज जाणतां येते. त्यावेळीं मोकळें वाटतें, स्वस्थता जाणवते, शान्तीचा अनुभव येतो. पण जेव्हां एकादी गोष्ट एकाएकी तुमच्यासमोर येते, तुम्ही ती आधाशीपणानें स्वीकारतां आणि उद्गारतां, "हां, अखेरीस मिळालीच कीं नाहीं !" त्यावेळीं निश्चित समजावें कीं, ती गोष्ट भगवन्ताकडून आलेली नाहीं. भगवंताशीं सख्यसंबंध प्रस्थापित झाल्याची वा होण्याची 'समचित्तता' ही पहिली आवश्यक गोष्ट आहे.

**प्रश्न**:—पण इच्छिलेली गोष्ट कधीं कधीं परमेश्वर देत नाहीं कां ? (अपूर्ण)

# भारताच्या गतकालीन अवनतीची मीमांसा

( लेखन काळ सन १९१० )

सुमारें एक शतकाच्या पाश्चिमात्य दडपणामुळें सुशिक्षित भारतीय आपल्या आर्य स्वत्वाला आणि आर्य संस्कृतीला दुरावले. भारतीय जनता निर्वीर्य झाली; प्रत्येक बाबतींत परावलंबी आणि अतीव आळशी बनली. सुदैवानें ही तामसिकता आतां दूर होत चालली आहे. तेव्हां, ही तामसिकता येथें कशी पसरली याची मीमांसा करणें आतां उद्‌बोधक ठरेल. अठराव्या शतकांत तामसिक अज्ञान आणि राजसिक प्रवृत्ति यांनीं भारत व्याप्त झाला होता. आसुरी प्रकृतीचीं, राष्ट्रविरोधी, स्वार्थी, बेजबाबदार, कर्तव्यविमुख अशीं हजारों माणसें येथें जन्मास आलीं; त्यांनीं आमच्या भावी गुलामगिरीचा भक्कम पाया घातला. नेमक्या ह्याच वेळीं, कांहीं गूढ ईश्वरी संकेताच्या पूर्ततेसाठीं, हजारों मैलांवरून येऊन इंग्रज व्यापाऱ्यांनीं भारतांत पाय ठेवला. स्वतःच्या पापाच्या भाराखालीं वांकून गेलेला भारत सहजीं परकीयांच्या हातीं गेला. खरोखरीच, ह्या अद्‌भुत घटनेकडे जग आजहि आश्चर्यचकित भावनेनें पहात आहे; आणि दुसरें कोणतें समाधानकारक उत्तर न मिळाल्यानें सर्वजण इंग्रजांच्या लोकोत्तर गुणांचा अतिरिक्त उदोउदो करीत आहेत. अर्थात् ह्या इंग्रजांच्या अंगीं कांहीं खरोखरीच फार चांगले गुण आहेत. ते गुण जर त्यांच्या अंगीं नसते तर एक प्रभावी दिग्‌विजयी राष्ट्र म्हणून ते पुढें येऊंच शकले नसते. परंतु आमची क्षुद्रता व त्यांची श्रेष्ठता, भारतीयांचे दुर्गुण व इंग्रजांचे सद्‌गुण हेंच आमच्या पारतंत्र्याचें एकमेव कारण आहे असें ज्यांना वाटतें ते लोक जरी सर्वतोपरी चुकत नसले तरी लोकांची थोडीशी दिशाभूल त्यांच्याकडन होत आहे हें मात्र खरें. म्हणून खरोखरी पारतंत्र्याचें कारण कोणतें, याचा अंतिम निर्णय ठरविण्यासाठीं आपण अधिक खोल जाऊन सूक्ष्म अवलोकन केलें पाहिजे.

साधे व्यापारी म्हणून येऊन, इंग्रजांनीं सारा भारतवर्ष पादाक्रांत करणें ही इतिहासांतील एक अद्वितीय घटना आहे. बरें, त्यावेळीं भारतांत पराक्रमी वीर पुरुष नव्हते असेंहि नाहीं, किंवा या देशांतील लोक अज्ञानी व असंस्कृत होते असेंहि नाहीं. तसें असतें तर आश्चर्यचकित होण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण वास्तविक परिस्थिति अगदीं उलट होती असें दिसतें. भारत ही रजपूत, मराठे, शीख, पठाण, मोंगल इत्यादि समर्थ जमातींची जन्मभूमि आहे. कुशाग्र प्रज्ञावंत बंगाली, विचारवंत दाक्षिणात्य आणि महाराष्ट्राचे राजकारण-चतुर ब्राह्मण हीं भारतमातेचीं गुणवान् पुत्ररत्नें आहेत; इंग्रजांनीं जेव्हां भारतदेश जिंकला त्यावेळेस येथें चतुर राजकारणी नाना फडणवीस, महादजी शिंद्यांसारखे रणधुरंधर सेनानी आणि रणजितसिंग व हैदरअल्लीसारखे प्रतिभासंपन्न राज्यनिर्माते व विख्यात पुरुष प्रत्येक प्रांतांत विद्यमान् होते. सामर्थ्य, धैर्य आणि बुद्धिमत्ता यांबाबतींत अठराव्या शतकांतील भारतीय त्या वेळच्या अन्य कोठल्याहि देशाहून कमी नव्हते. त्यावेळचा भारत हा श्रीसरस्वतीचें

मंदिर, महालक्ष्मीचें आगर आणि महाकालीचें क्रीडाक्षेत्र होता. जो देश जिंकण्याला, त्या पराक्रमी मुसलमानांना उत्तरोत्तर वाढतें सामर्थ्य असूनहि शेंकडों वर्षें लागलीं, ज्यासाठीं त्यांना अतोनात कष्ट करावे लागले आणि तरीहि ज्या देशावर त्यांना निरंकुश सत्ता गाजवितां आली नाहीं, तोच देश मूठभर इंग्रज व्यापाऱ्यांनीं अर्ध-शतकाच्या अल्पावधींत आपलासा करून गिळंकृत केला आणि एका शतकाच्या आंतच इंग्रजी साम्राज्याच्या छायेंत भारत मोहनिद्रावश झाला. आमच्यांतील एकतेच्या अभावामुळेंच असें घडलें असें तुम्ही म्हणाल, आणि तें थोडेंसें खरेंहि आहे. आम्हाला मान्य आहे कीं, आमच्यांतील एकतेचा अभाव हें आमच्या ऱ्हासाचें सर्वांत मोठें कारण आहे; पण तेंच केवळ एकमेव कारण नाहीं. कारण, त्यापूर्वींहि आमच्यांत एकता कधींच नव्हती. महाभारतकाळीं म्हणा किंवा सम्राट चंद्रगुप्त वा अशोक यांच्या वैभवशाली काळांत तरी आमच्यांत ऐक्य होतें कुठें? इतकेंच नव्हे तर मुसलमानांनीं जेव्हां येथें धुडगूस घातला तेव्हां आणि अठराव्या शतकांतहि आमच्यांत एकी नव्हती. तात्पर्य हें कीं, एकतेचा अभाव हें कांहीं या अद्‌भुत चमत्काराचें एकमेव कारण होऊं शकत नाहीं. ब्रिटिशांची श्रेष्ठ गुणवत्ता हेंच त्यांच्या विजयाचें रहस्य आहे असें म्हणणारांना आम्ही एवढेंच विचारतों कीं, त्यावेळच्या भारतीयांहून आमचे विजेते अधिक गुणवान् व लायक होते यास कांहीं ऐतिहासिक पुरावा तुमच्याजवळ आहे काय? खरेंच, लॉर्ड क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंग्ज वगैरे महारथींनीं आणि अन्य लुटारू इंग्रज व्यापाऱ्यांनीं भारतभूमीला जिंकून अद्वितीय शौर्य, अथक परिश्रम आणि स्वाभिमान यांचा जसा धडा घालून दिला, तसेंच आपल्या क्रूर, स्वार्थांध व अर्थलोलूप वर्तनानें अमानुष अत्याचाराचेंहि उत्कृष्ट उदाहरण दाखवून दिलें आहे. अशा या 'असुरांच्या' 'लोकोत्तर'पणाचें जेव्हां लोक कौतुक करतात तेव्हां आम्हाला आमचें हंसूं आवरत नाहीं. शौर्य, परिश्रम आणि अहंकार हें असुरांचें वैशिष्ट्य आहे; ते त्यांचे सद्‌गुण आहेत. क्लाईव्ह वगैरे इंग्रजांतहि हे सद्‌गुण होते. परंतु त्यांचे आसुरी दुर्गुणहि भारतीयांच्या दुर्गुणांपेक्षां यत्किंचितहि कमी नव्हते. म्हणून इंग्रजांच्या सद्‌गुणांनीं ही अघटित घटना घडली असें म्हणतां येणार नाहीं.

त्यावेळचे भारतीय आणि इंग्रज सारखेच आसुरी वृत्तीचे होते. तो कांहीं देवासुर-संग्राम नव्हता; तर असुरांचाच आपआपसांतील तो झगडा होता. असें असतांना पाश्चात्य असुरांमध्यें असा कोणता महान् गुण होता कीं त्यामुळें त्यांचे शौर्य, धैर्य आणि चातुर्य सफल झालें? आणि भारतीय असुरांत असा कोणता दोष होता कीं ज्यामुळें त्यांचें शौर्य, धैर्य व चातुर्य विफल झालें? याचें उत्तर एकच कीं, भारतीय जरी सर्व गुणांच्या बाबतींत इंग्रजांशीं तुल्यबळ होते तरी त्यांच्यांत राष्ट्रीयत्वाचा पूर्ण अभाव होता. याच्या उलट राष्ट्रीयत्वाची भावना इंग्रजांत पूर्णपणें विकसित झाली होती. याचा अर्थ, इंग्रज देशभक्त होते आणि त्या देशभक्तीच्या भावनेनेंच त्यांना भारतांत विराट साम्राज्य स्थापण्यास उद्युक्त केलें होतें, अशी चुकीची समजूत कोणीं करून घेऊं नये. कारण देशभक्ति आणि राष्ट्रीयत्वाची भावना या दोन अगदीं स्वतंत्र वृत्ती आहेत. मातृभूमि हेंच खऱ्या देशभक्ताचें सर्वस्व असतें. तीच त्याचें आराध्यदैवत आणि तिची सेवा हाच असतो त्याचा मोक्ष! आपलीं सारीं कर्में तो यज्ञ

**भावननें मातृभूच्या चरणीं समर्पित करतो,** आपला स्वार्थ देशाच्या स्वार्थामध्यें विलीन करून टाकतो. अठराव्या शतकांतील इंग्रजांत ही भावना नव्हती; नव्हे, जडवादी पाश्चात्य हृदयांत ही भावना कायमची अशी राहूंच शकत नाहीं. स्वदेशहितासाठीं इंग्रज लोक कांहीं भारतांत आले नाहींत. ते येथें आले व्यापारद्वारां आर्थिक लाभ करून घ्यायला. आपल्या देशप्रेमा-मुळें त्यांनीं भारत देश जिंकला आणि लुटला नाहीं. हा देश त्यांनीं जिंकला मुख्यतः त्यांच्या स्वार्थासाठीं. तथापि, देशभक्त नसून सुद्धां त्यांच्यांत राष्ट्रीयत्वाची भावना होती. "आम्ही इंग्रज आहोंत, आमचा देश सर्वश्रेष्ठ आहे, आमची भाषा, परंपरा आणि आचारविचार, आमचा धर्म आणि संस्कृति, आमचें चारित्र्य, शौर्य, नीतिमत्ता आणि विद्वत्ता, आमचीं मतें आणि आमचें कार्य अगदीं निर्दोष, अतुलनीय व परिपूर्ण आहेत. अन्य देशाला हे साधणार नाहीं", असा त्यांना अभिमान असे. "माझ्या देशाचें हित तेंच माझें हित. त्याचा गौरव तोच माझा गौरव. माझ्या देशबांधवांचा उत्कर्ष तोच माझाहि उत्कर्ष; केवळ वैयक्तिक हित साधण्यापेक्षां त्याचबरोबर देशाचेंहि हित साधावें अशी वृत्ति, देशाचा मान, गौरव आणि उत्कर्ष यासाठीं प्राणार्पण करण्याची तयारी ठेवणें किंबहुना हेंच प्रत्येकाचें एकमेव कर्तव्य आहे ही भावना असणें", याला म्हणतात राष्ट्रीयत्वाची भावना. देशभक्ति ही स्वभावतः एक सात्विक वृत्ति आहे, तर राष्ट्रीयत्वाची भावना ही एक राजसिक वृत्ति आहे. देशाच्या अहंकारांत स्वतःच्या अहंकाराचें विसर्जन करणाराच खरा आदर्श देशभक्त होय. स्वतःच्या अहंकाराला धक्का लागूं न देतां देशाचा अहंकार वाढविणारी व्यक्ति राष्ट्रभावनायुक्त म्हणतां येईल, देशभक्त नव्हे. त्या काळांतील भारतीयांत ही राष्ट्रीयत्वाची जाणीव नव्हती. आम्ही असें म्हणत नाहीं कीं, त्यावेळच्या लोकांत देशहिताबद्दल पूर्ण अनास्था होती; पण जेव्हां, देशहित कीं स्वहित असा पेंच त्यांना पडे तेव्हां स्वार्थासाठीं ते लोक खुशाल देशहिताकडे दुर्लक्ष करीत. **आमच्या मतें एकतेच्या अभावापेक्षां राष्ट्रीयत्वाच्या जाणिवेचा हा अभावच आमच्या ऱ्हासाचें प्रमुख कारण होतें.** या राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा जर सर्वत्र, देशभर प्रसार झाला तर नानाप्रकारच्या भेदांनीं भरलेल्या या खंडप्राय देशांतहि ऐक्य निर्माण होऊं शकेल. 'एकता पाहिजे, एकता पाहिजे,' असा नुसता घोष केल्यानें, काम होणार नाहीं. ब्रिटिशांच्या भारतविजयाचें हेंच प्रधान रहस्य आहे. असुरांचा असुरांशीं संग्राम झाला, परंतु राष्ट्रीयत्वाची जाणीव असलेल्या सुसंघटित असुरांनीं अन्य सर्व गुण समान असूनहि राष्ट्रीय भावनेचा व एकतेचा अभाव असलेल्या आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव केला. विधात्याच्या नियमाप्रमाणें जो अधिक बलवान व कुशल असेल त्याचाच कुस्तींत विजय होतो; जो अधिक वेगवान व दमदार असेल तोच शर्यतींत पहिला येतो. उच्च नैतिक गुण अथवा नुसतीच योग्यता असल्यानें शर्यतीमध्यें किंवा कुस्तीमध्यें कोणी विजयी होऊं शकत नाहीं. उपयुक्त शक्ति असणें अगत्य आहे. अशा-रीतीनें दुष्ट व आसुरी प्रकृतीचा एखादा देशहि आपल्या राष्ट्रीयत्वाच्या जाणिवेच्या जोरावर साम्राज्य स्थापू शकतो, तर दुसरा एकादा देश उदात्त नैतिक गुण असूनहि राष्ट्रीय जाणि-वेच्या अभावामुळें आपलें स्वातंत्र्य गमावतो, आणि परिणामीं त्या देशाचें उदात्त चारित्र्य, संस्कृति आणि इतर सद्गुण हळुहळु नामशेष होतात.

राजकीय दृष्टिकोणांतून पाहिलें तरीहि वरील कारणमीमांसा आमच्या गुलामगिरीच्या रहस्यावर सर्वोत्तम प्रकाश टाकते. परंतु याच्यामागें आणखीहि एक श्रेष्ठतर सत्य लपलेलें आहे. आम्हीं अगोदरच सांगितलें आहे कीं, त्यावेळचा भारत हा तामसिक अज्ञान व राजसिक आवेग यांच्या पूर्ण आहारीं गेला होता. ही अवस्था अध:पाताचें पूर्व दुश्चिह्न असते. राजसिक प्रवृत्तींवर सर्व लक्ष केंद्रित केल्यानें राजसिक सामर्थ्य निश्चित वाढतें, पण कांहीं काळानें, कुठल्याहि सात्विकतेच्या अभावीं तिचें तामसिक वृत्तींत स्खलन होतें. उन्मत्त आणि नियंत्रित रजोगुणी कर्म लवकरच कंटाळतें व थकतें आणि मग त्याचेंच नैराश्य, नैष्कर्म्य व दौर्बल्य यांमध्यें रूपांतर होतें. सात्विकतेच्या आधारेंच राजसिक शक्ति टिकवितां येते. सात्विक वृत्ति नसेल तर निदान सात्विक आदर्शांची तरी फारच आवश्यकता असते. या सात्विक आदर्शांच्या द्वारां राजसिक शक्तीला सुनियंत्रित व स्थायी स्वरूप प्राप्त होतें. स्वातंत्र्य व सुव्यवस्था हे दोन सात्विक आदर्श इंग्रजांनीं नेहमीं आपल्यासमोर ठेवले, हेंच त्यांच्या मोठेपणाचें व विजयाचें एक रहस्य आहे. १९ व्या शतकांतील इंग्लंड हा जगत्कल्याणाच्या उच्च आदर्शानें भारावला होता. तोच त्या देशाच्या वैभवाचा सुवर्णकाल ! शिवाय त्यावेळीं सर्व युरोपभर जागृत झालेली प्रचंड ज्ञानलालसा—जिच्या प्रेरणेनें पाश्चात्य लोकांनीं नवेनवे शेंकडों वैज्ञानिक शोध लावले व कणमात्र ज्ञानप्राप्तीसाठींहि हजारों लोकांनीं स्वेच्छेनें प्राणार्पण केलें—ती ज्ञानार्जनाची सात्विक तृष्णा इंग्रजांत पण जागृत होती. ही सात्विक तळमळ म्हणजे त्यांच्या सामर्थ्याचा जिवंत झरा ! आज ह्या सात्विक तेजाच्या अभावीं त्यांच्या राजसिक शक्तीचें तामसिकतेमध्यें रूपांतर होत आहे. इंग्लंड आज तेजोहीन झालें आहे. इंग्रजांची श्रेष्ठता, धैर्य आणि शक्ति या गुणांची जागा आज भय, असंतोष आणि आत्मविश्वासाचा अभाव यांनीं घेतली आहे. या उलट आमच्या देशाची स्थिति आहे. भारत हा एक सात्विक वृत्तीचा देश होता. त्या सात्त्विकतेच्या प्रभावानेंच एके काळीं हा देश अतुलनीय ज्ञानसमृद्ध आणि वीरशाली होता; आणि एकतेचा अभाव असूनहि या सात्विक शक्तीच्या आधारें शेंकडों वर्षें परकीयांच्या आक्रमणांचा यशस्वीरीतीनें प्रतीकार व दमन करण्यास भारत समर्थ झाला. परंतु नंतर राजसिक शक्तींचा प्रादुर्भाव वाढूं लागला आणि सात्विकतेचा ऱ्हास होऊं लागला. येथें मुसलमानांचें आक्रमण सुरु झालें तेव्हां सार्वत्रिक ज्ञानाला ओहोटी लागली होती आणि राजसिक वृत्ति-प्रधान रजपूत भारताच्या सिंहासनावर अधिष्ठित झाले होते. उत्तर भारतांतील राजे त्यावेळीं युद्ध-विग्रहांत व गृहकलहांत गुंतले होते. बुद्ध धर्माच्या अवनतीमुळें सर्व बंगाल प्रांत तमोगुणानें व्याप्त झाला होता. अशावेळीं आध्यात्मिक ज्ञानाला दक्षिण भारतांत आश्रय मिळाला आणि याच सात्विक बलावर दक्षिण भारत आपलें स्वातंत्र्य दीर्घकालपर्यंत टिकवूं शकला. पण हळूंहळूं ज्ञानपिपासा व ज्ञानाचा विकास क्षीण होऊं लागला. त्याचा परिणाम असा झाला कीं, समाजांत दंभ आणि ढोंग वाढलें; आध्यात्मिक ज्ञान, योगशक्तीचा विकास व आत्मसाक्षात्कार यांची जागा तामसिक वृत्तीच्या धर्मांधतेनें घेतली. राजसिक कामनापूर्तीच्या रुक्ष कठोर व्रत-उद्यापनांचा पसारा वाढला आणि धर्माच्या नांवाखालीं सर्वत्र अनाचार माजला. वर्णाश्रमधर्म लुप्त होऊन बाह्य कर्मकांडाचें प्रस्थ माजलें. थोडक्यांत म्हणजे

सनातन धर्माचा आत्मा अदृश्य झाला व प्राणहीन कवच मात्र बाकी राहिलें. ग्रीस, रोम, ईजिप्त, असीरिया इत्यादि देशांतील महान् साम्राज्यें त्या त्या देशांतील याच सनातन धर्माच्या अवनतीमुळें नामशेष झालीं होतीं. परंतु सनातन धर्मनिष्ठ भारताच्या सुदैवानें त्याच सनातन धर्माच्या मूल स्रोतांतून संजीवनदायी अमृताचा वेळोवेळीं वर्षाव होऊन भारताचें रक्षण झालें. शंकराचार्य, रामानुज, चैतन्य, नानक, रामदास आणि तुकाराम या संतांनीं या ब्रह्मविद्येचें संजीवन शिंपून मृतप्राय होत चाललेल्या या देशांत पुनश्च चैतन्य खेळविलें. परंतु तमोगुणाची व रजोगुणाची लाट इतकी प्रचंड व बलवान् होती कीं, तिच्या आवेगानें सोन्याचीहि माती होऊं लागली. **श्रीशंकराचार्यांनीं दिलेल्या ज्ञानाच्या द्वारां सर्वसाधारण जनता आपल्या तामसिक वृत्तीचें समर्थन करूं लागली; श्रीचैतन्यांनीं शिकविलेला प्रेमधर्म तामसिक निष्क्रियतेचें छत्र बनला; श्रीरामदासांच्या महाराष्ट्र-धर्माची शिकवण मराठे विसरले. केवळ स्वार्थसाधन आणि गृहकलह यांत त्यांनीं सर्व शक्तीचा अपव्यय केला. श्रीशिवछत्रपतींची आणि बाजीराव पेशव्यांची हिंदुपदपातशाही अशारीतीनें नाश पावली.** अठराव्या शतकांत तर या लाटेनें कळस गांठला. ढोंगी पंडितांनीं बांधलेल्या बुरसट भिंतींमध्यें समाजाचे आणि धर्माचे प्राण गुदमरूं लागले. बाह्य आचार आणि विधी यांचें अवडंबर माजलें. आर्यज्ञान लुप्त होऊं लागल्यामुळें आणि आर्यचारित्र्य नष्ट होऊं लागल्यानें नाइलाजानें समाजाचा त्याग करून आध्यात्मिक विद्येनें अरण्याची वाट धरली. संन्याशाच्या कुटीचा तिनें आश्रय घेतला आणि भक्तांच्या हृदयांत वास केला. सबंध देशभर तमोगुणाची गाढ छाया पसरली. तरीहि बाह्य धर्माचारांच्या पडद्यामागें प्रचंड राजसिक प्रवृत्ति ही स्वार्थी आणि पापीं कृत्यें बेलाशक करीत राहिली होती. अर्थातच त्यानें राष्ट्राचा अंत ओढवला. सामर्थ्याची येथें वाण नव्हती. परंतु आर्यधर्माच्या अभावीं, सत्त्वतेजाच्या अभावीं, हें सामर्थ्यच आमच्या नाशास कारण झालें; आत्मरक्षण करण्यासहि तें असमर्थ ठरलें. आसुरी वृत्तीच्या इंग्रजांनीं, आसुरी वृत्तीच्या भारतीयांचा पराभव करून ह्या सर्व नाटकावर शेवटचा पडदा टाकला. भारत शृंखलाबद्ध आणि निश्चेष्ट झाला. तमोगुणाच्या गुंगीमध्यें भारत निद्रिस्त झाला. अज्ञान, अनिच्छा, निष्क्रियता, आत्मविश्वासाचा अभाव, स्वाभिमानशून्यता, गुलामी मनोवृत्ती, परकीयांचें अनुकरण आणि परधर्मसेवा, नैराश्य, आत्मनिंदा, क्षुद्रता, आळस हे सर्व तमोगुणाचे विशेष आहेत. एकोणीसाव्या शतकांतील भारतीयांत यांपैकीं कुठल्या 'गुणांची' वाण होती ? या 'गुणांच्याच' प्राबल्यानें त्या शतकांतील सर्व प्रयास तमोगुणप्रधान शक्तीनें ग्रासले गेले.

ईश्वरी संकल्पाप्रमाणें भारत जेव्हां या मोहनिद्रेंतून जागा झाला तेव्हां सर्वप्रथम ही राष्ट्रीयत्वाची भावना, ही ज्वलंत शक्ति त्याच्या नसानसांतून खेळूं लागली. त्याचबरोबर देशांतील तरूण देशभक्तीच्या वेडानें जणु भारावून गेले. 'आम्ही पाश्चात्य देशवासी नाहीं आम्ही आशियाचे रहिवासी आहों, आम्ही आर्य आहों, भारतीय आहों' ही स्वत्वाची जाणीव आम्हाला झाली. राष्ट्रीयत्वाची जाणीव तर आतां झाली आहे; पण तिच्यामध्यें देशप्रेमाचा, देशभक्तीचा संचार झाल्याशिवाय या राष्ट्रीय भावनेस बहर येऊं शकणार नाहीं. भारतमातेची आराधना हा आमच्या देशभक्तीचा पाया झाला पाहिजे. श्रीबंकिमचंद्रांच्या 'वंदेमातरम्' ची

जेव्हां प्रथम गर्जना झाली, बाह्येन्द्रियांचा अडसर बाजूस सारून तें गान जेव्हां आमच्या हृदयमंदिरांत निनादू लागलें, त्याच दिवशीं आमच्या हृदयांत देशभक्तीचा जन्म झाला; त्याच दिवशीं आमच्या हृदयगाभाऱ्यांत भारतमातेची प्राणप्रतिष्ठा झाली. 'हीच आमची माता, हीच ती आमची जगदंबा आहे,' हें औपनिषदिक सत्य आम्हां भारतीयांच्या राष्ट्रीय अभ्युत्थानाचें बीज आहे. जीवात्मा हा जसा परमात्म्याचा एक अंश आहे, त्याची शक्ति ही जशी भगवंताच्या शक्तीचा अंश आहे, तसेच हे तीस कोटी भारतीयहि सर्वव्यापी वासुदेवाचे अंश आहेत. त्याचप्रमाणें या कोटयावधि भारतीयांचें रक्षण करणारी ही बहुभुजा शक्तिस्वरूपिणी भारतमाता, भगवंताचीच एक शक्ति आहे. त्याच जगदंबेनें, त्याच विश्वव्यापक महाकालीनें धारण केलेलें तें एक रूप आहे. या जगदंबेचा आमच्या हृदयांत आविर्भाव व्हावा, मातृप्रेम आमच्यामध्यें जागृत व्हावें, भारतीयांच्या मनांत आणि प्राणांत भारतमातेच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व्हावी म्हणूनच आम्हाला या गुलामगिरीची शिक्षा भोगावी लागली; अतोनात छळ, अपमान सहन करावे लागले. आमच्या या अपार कष्टाचें कारण म्हणजे, ईश्वरीसंकेतच तसा होता हें होय. आतां तें कार्य संपलें आहे. पण पुढें काय ?

आतां आमचें पहिलें कर्तव्य हें कीं, आम्ही आमच्या प्राचीन आर्यतेजाचें पुनरुज्जीवन केलें पाहिजे. आर्य संस्कृति आणि आर्यविद्या यांचा पुनरुद्धार झाला पाहिजे. दुसरें म्हणजे योगविद्येचा पुनर्विकास करावयास पाहिजे. आर्योचित ज्ञानार्जनाची तीव्र तळमळ आमच्यांत जागृत व्हावयास पाहिजे. आर्योचित कर्मशक्तीच्या द्वारां नवयुगाला आवश्यक असलेली साधनसामग्री संचित केली पाहिजे. आम्हाला गरज आहे त्या भगीरथ प्रयत्नांची. त्याच्याशिवाय नव्या मनूची ही गंगा येथें अवतरणार नाहीं. प्रचंड आवेशाच्या काळांत उसळलेली देशभक्तीची ही लाट, ही प्रचंड शक्ति वायां जातां कामां नये. भारतमातेच्या कार्यपूर्तीसाठीं या शक्तीचा योग्य उपयोग करून घेतला पाहिजे. योगमार्गाचा आणि कर्माचा शोध करीत असलेल्या भारतीय तरुणांनो, तुमच्या भावनावेगांना लगाम घाला आणि शक्तीची साधना करा. तुम्हाला हें जें महान् कार्य संपादित करावयाचें आहे तें नुसत्या भावनावेगानें होणारें नाहीं. त्यासाठीं गरज आहे शक्तीची. तुमच्या पूर्वज. ऋषिमुनींनीं या अमर्याद शक्तीची गुरुकिल्ली मिळविलेली आहे. त्यांच्या शिकवणीचें अनुसरण करून ती हस्तगत करा. ती शक्ति तुमच्या शरीरामध्यें अवतरण्यास उत्सुक झाली आहे. तिला शरण जा. तुमच्या द्वारां तिलाच हें महान् कार्य करूं द्या. मग पहा काय चमत्कार होतो तो ! जादूच्या कांडीप्रमाणें क्षणार्धांत सर्वत्र बदल होईल. तुम्हांला साधन करून माता इतक्या शीघ्रतेनें आणि सामर्थ्यानें तिचें कार्य साध्य करील कीं सारें जगच काय, तुम्ही स्वतःहि आश्चर्यचकित होऊन जाल. पण लक्षांत ठेवा, तिच्या शक्तीशिवाय कांहींच कार्यभाग होणार नाहीं. या भारतमातेची मूर्ति तुमच्या हृदयमंदिरांत आहे. तिचें पूजन आणि सेवा करावयास आतांपर्यंत तुम्ही शिकलां आहांत; आतां तुमचें सर्वस्व तिला समर्पण करा. भारतमातेचें हें महान् कार्य पूर्ण करण्यास हाच एकमेव मार्ग आहे.

—श्रीअरविंद.

"धर्म," या बंगाली साप्ताहिका" वरून

Works of Sri Aurobindo : Writings In Bengali Translation
The Problem of the Past

# अचूक निर्णय

( विद्यार्थ्यांसाठीं )

अगदीं सरळ ताठ अशी एक काठी घ्या आणि ती निम्मी पाण्यांत बुडवा. ती मध्यें मोडल्यासारखी दिसेल. पण हा केवळ आभासच असतो. यावरून जर तुम्ही अशी समजूत करून घ्याल कीं, ती काठी मुळांतच वांकडी आहे, तर ती चूक होईल. कारण पाण्यांतून बाहेर काढल्याबरोबर तीच काठी पूर्वीसारखीच तुम्हांला सरळ दिसेल.

आतां, एकादी खरोखरीच वांकडी काठी घ्या. मोठ्या कौशल्यानें विशिष्ट कोन करून जर तुम्हीं ती बुडविलीत तर ती अगदीं सरळ दिसूं शकेल.

माणसांना देखील अशा काठ्यांची उपमा देतां येईल. तुम्हीं त्यांच्याकडे चुकीच्या दृष्टिकोनांतून पाहिलेंत तर तीं सरळ असूनहि तुम्हाला सरळ दिसणार नाहींत. उलट कांहीं लोक तुम्हांला वरून अत्यंत सरळ दिसतील पण आंत मात्र ते दुष्ट असूं शकतील; म्हणून केवळ वर वर दिसणाऱ्या गोष्टींवर तुम्हीं विश्वास ठेवतां कामा नये; किंवा विचार न करतां कोणाहि व्यक्तीविषयीं आपलें मत ठोकून देतां कामा नये.

गांवांत भिक्षा मागून राहणाऱ्या एका साधूला एकदां एका शेतामध्यें एक एडका दिसला. साधूकडे पाहतांच तो रागानें बेभान झाला आणि त्याला मुसंडी मारण्यासाठीं मान खालीं वांकवून कांहीं पावलें मागें सरला.

हें पाहून त्या साधूला वाटलें, किती सुस्वभावी आणि बुद्धिमान् प्राणी हा! माझी पात्रता ओळखून मला नमस्कार करण्यासाठींच त्यानें आपलें मस्तक नमविलें आहे.

तो असा विचार करतो न करतो तोंच आपल्या डोक्यानें धडकी मारून एडक्यानें त्या साधूला जमिनीवर लोळविलें.

अशाच रीतीनें असें अनेकवेळां होऊं शकतें कीं, अयोग्य माणसांविषयीं तुम्ही फारच चांगलीं मतें करून घेतां किंवा त्यांच्यावर भलताच विश्वास ठेवतां. कारण कांहीं माणसें, धनगराचा कोट घालून मेंढ्यांना फसविणाऱ्या लांडग्याप्रमाणें किंवा सिंहाचें कातडें पांघरून भिवविण्याचा यत्न करणाऱ्या गाढवाप्रमाणें असतात.

★

दुसऱ्याच्या केवळ बाह्य स्वरूपावर विश्वास ठेवल्यामुळें फसण्याचा संभव असतो हें खरें; पण कित्येकदां लोक कांहीं विचार न करतांच दोषैक दृष्टीनें पाहून एकदम एखाद्या-बद्दल मत बनवितात.

असें सांगतात ——

पूर्वीं एकदां अरबांचा बादशाह 'इस्माईल साफवी' खुरासनचें राज्य जिंकून आपल्या

राजधानीला परत जात होता. 'हातिफी' नांवाच्या सुप्रसिद्ध कवीचें घर वाटेंतच होतें, म्हणून जातां जातां त्यालाहि भेटून जावें असें बादशहाला वाटलें. त्याला भेटण्याची त्याची इच्छा इतकी अनिवार झाली कीं, कवि दार उघडावयास येईपर्यंतहि बादशहाला दम निघेना. अंगणांतील वृक्षाच्या फांद्या बाहेरच्या भिंतीपर्यंत आल्या होत्या, त्यापैकींच एका फांदीला लोंबकळून तो भिंतीवर चढला आणि कवीच्या बागेंत उतरला.

एकादा मनुष्य असा अचानक तुमच्या घरांत शिरला तर तुम्हांला काय वाटेल ? त्याला चोर समजून तुम्ही त्याची चांगलीच संभावना कराल यांत शंका नाहीं.

परंतु 'हातिफीनें' झाल्या प्रकाराच्या बाह्य स्वरूपावरून एकदम कांहीं ग्रह करून घेतला नाहीं. अनपेक्षितपणें आलेल्या या आपल्या पाहुण्याचें त्यानें प्रेमानें स्वागत केलें. कांहीं काळा-नंतर, आपल्या पराक्रमाचे पोवाडे गावेत अशी हौस असलेल्या त्याच बादशहाच्या रणझुंझार-पणाविषयीं हातिफीनें कांहीं कवनें रचलीं.

★

दुसऱ्याचें उणेंदुणें काढणें, त्यांचे दोष दाखविणें अगदीं सोपें आहे. पण प्रत्येकांतच दोष असतात आणि ते इतरांनाच चटकन् दिसतात. पण तुम्हाला जर एकाद्याविषयीं शक्य तितकें अचूक मत बनवावयाचें असेल तर त्याच्यामध्यें उत्तम असें काय आहे हें आपण नेहमीं पाहण्यास शिकलें पाहिजे. म्हणूनच असें म्हणतात कीं, तुमचा मित्र तिरळा असेल तर त्याच्या तोंडाकडेच पाहूं नका.

दिसायला अगदीं मूर्ख आणि मंद असलेला तुमचा एकादा वर्गबंधूच कदाचित् सबंध वर्गांत जास्त उद्योगी व मेहनती असेल आणि स्वभावानें कडक व कठोर वाटणारे शिक्षकच कदाचित् तुमच्यावर खरोखरी खूप प्रेम करीत असतील, तुमचें कल्याण व्हावें, तुमची प्रगती व्हावी असें त्यांना मनापासून वाटत असेल. तुम्हांला त्रास देणारा आणि तुम्हाला उद्धट वाटणारा मित्रच कदाचित् तुमचा सर्वांत अधिक हितकर्ता मित्र नसेल कशावरून ?

कित्येक दुष्ट आणि अवमानित लोकांच्या अंतःकरणांतहि कांहीं अंशानें चांगले गुण वसत असतात; आपण ते पाहूं शकत नाहीं !

पूर्वीं 'आगोबीयो' नांवाच्या एका खेडेगांवाच्या आसपासच्या रानांत एका मोठ्या थोरल्या लांडग्यानें खूप धुमाकूळ घातला होता. लोक इतके घाबरून गेले होते कीं, बाहेर पडायचें सुद्धां त्यांना धारिष्ट होईना. कारण कित्येक पशू आणि माणसें त्यानें मारून टाकलीं होतीं.

सेंट फ्रान्सिसनें त्या अत्यंत भयंकर प्राण्याला ताळ्यावर आणण्याचें ठरविलें. तो गांवा-बाहेर गेला. त्याच्या पाठीमागून कांहीं अंतरावरून गांवकरी चालले होते. सेंट फ्रान्सिस जवळ येतांच त्याच्यावर त्या लांडग्यानें झडप घातली. आपला जबडा उघडला. पण फ्रान्सिसनें शांतपणें कांहीं खूण करतांच लांडग्याचा संताप शांत झाला आणि तो त्याच्या पायाशीं एकाद्या गरीब कोंकराप्रमाणें येऊन बसला.

फ्रान्सिस त्याला म्हणाला, 'बेटा, या लोकांना तूं खूपच सतावून सोडलं आहेस. तेव्हां

खुनी माणसासारखी मृत्यूचीच शिक्षा तुला योग्य आहे. सारे लोक तुला भीत आहेत. पण तूं आणि 'आगोबिओ' च्या गांवकऱ्यांनीं सलोख्यानें आणि शांतीनें रहावें अशी माझी फार इच्छा आहे. त्यांतच मला आनंद आहे.

लांडग्यानें मान खालीं घातली व तो शेपटी हलवूं लागला.

फ्रान्सिस पुन्हां म्हणाला,"मित्रा, लांडगोबा, तूं जर या लोकांशीं चांगल्या तऱ्हेनें राहिलास तर ते सुद्धां तुझ्याशीं चांगले वागतील––तुला ते रोज पुरेसें खाद्य पुरवितील––असें मी तुला आश्वासन देतो. तर मग तूं कोणत्याहि प्रकारें त्यांना त्रास देणार नाहींस असें मला वचन देशील कां ?" लांडग्यानें आपलें डोकें खालीं वांकविलें आणि जणुं वचन देण्यासाठीं आपला उजवा पंजा साधूच्या हातांत दिला. अशाप्रकारें दोन्ही पक्षांत प्रेमाचें नातें निर्माण झालें.

नंतर फ्रान्सिसनें त्या लांडग्याला आगोबिओ गांवाच्या बाजारपेठेंत नेलें आणि आधीं लांडग्याला जें सांगितलें होतें तेंच पुनः सर्व गांवकऱ्यांसमोर सांगितलें. त्या लांडग्यानेंहि आपली प्रतिज्ञा जाहीर करण्यासाठींच जणुं आपला पंजा त्या साधूच्या हातांत दिला.

त्या दिवसापासून दोन वर्षें तो लांडगा त्या गांवांत राहिला. पण त्यानें एवढासुद्धां कोणाला अपाय केला नाहीं. गांवांतील लोकांनींहि त्याला रोज नियमितपणें भक्ष्य पोंचविलें. तो मेल्यावर तर सर्वांनाच वाईट वाटलें.

एकदम वरवर पाहणाराला तो लांडगा कितीहि क्रूर दिसला असला तरी त्याच्यांत कांहींतरी सद्भावना होतीच. पण फ्रान्सिसनें त्याला आपला मित्र म्हणून हांक मारेपर्यंत कोणालाच ती कळली नव्हती.

येथें हें लक्षांत घ्यावयास पाहिजे कीं, या गोष्टींतील लांडगा हा, लोकांच्या हेटाळणीस पात्र झालेल्या दुर्वर्तनी व्यक्तींचा प्रतिनिधि आहे. सुधारण्याच्या दृष्टीनें हाताबाहेर गेलेल्या किंबहुना सुधारण्यास अशक्य वाटणाऱ्या दुर्वर्तनी माणसांतहि चांगुलपणाचे अंकुर असतात, आणि थोड्या प्रेम-सिंचनानेंहि ते वाढीस लावतां येतात हेंच दर्शविण्याचा या गोष्टीचा उद्देश आहे.

लांकूड कितीहि जुनें-जळमट झालें तरी त्यांत कांहीं अंश चांगल्या लांकडाचा असतोच, असें चांगला सुतार तुम्हाला सांगेल. अडाणी कामगार, कांहींच कळत नसल्यामुळें, सर्वच लांकूड निकामी म्हणून फेंकून देईल; पण उलट तज्ज्ञ, वाकबगार सुतार, त्या लांकडाचा वाळवी लागलेला भाग कापून, उरलेला तुकडा सफाईनें सुंदर बनवेल. झाडांच्या खोडांमधील जो गांठीचा भाग असतो त्याचाच उपयोग करून कलावान् सुतार त्याच्यांतून अत्यंत आकर्षक लहान लहान मूर्ति कोरील.

★

युरोपियन लोकांच्या दृष्टीनें 'गियाना' (Guiana) हा प्रदेश फारच भयानक, भेसूर असल्यानें सक्तमजुरीची किंवा हद्दपारीची शिक्षा झालेल्या गुन्हेगारांसाठीं तेथें त्यांनीं तुरुंग बांधलेले आहेत.

कांहीं वर्षांपूर्वीं सैन्याचा एक अधिकारी, सक्तमजुरीची शिक्षा झालेल्या तेथील कैद्यांना

घेऊन 'केन' (Cayene) नामक नगरीला जात होता. समुद्राला भरती असल्यामुळें बंदराजवळच तो दुर्दैवानें पाण्यांत पडला.

हें बंदर असें होतें कीं, कांहीं वेळां ओहोटीच्या वेळीं बंदराच्या तोंडाशीं इतकी वाळू भरत असे कीं, तेथें जहाज आणून उभें करणेंच अशक्य होत असे. भरती आली असतां इतके जोरानें पाणी उसळून येत असे कीं, त्याबरोबर कितीतरी शार्क मासे येत आणि साऱ्या किनाऱ्यावरील लोकांना उपद्रव होई.

प्रवाहांत पडलेल्या त्या अधिकाऱ्याला मोठा पेंच पडला; कारण त्याला धड पोहतां येईना आणि दुसऱ्या बाजूनें शार्क मासे गिळंकृत करण्याचीहि धडकी भरली होती.

कोणीं सुचवलें अथवा सांगतिलें म्हणून नव्हे तर आपण होऊनच एका कैद्यानें पाण्यांत उडी टाकली; त्या अधिकाऱ्याला कसेंबसें धरून मोठ्या प्रयत्नानें त्यानें त्याला किनाऱ्यावर आणलें, त्याचा जीव वांचविला.

वरील मनुष्य गुन्हेगार होता. कैद्याचा डगला घालून आणि नंबर असलेला बिल्ला लावून जेव्हां तो जात असे, तेव्हां अनेकदां लोक तिरस्कारानें तोंड फिरवून त्याच्यापासून निघून जात असत. त्याच्याकडे नुसते पाहण्याच्या किंवा एकादा गोड शब्द बोलण्याच्याहि लायकीचा तो नाहीं असें त्यांना वाटे. पण त्यांचें हें मत सर्वस्वीं चूक होतें. कारण त्याच्याहि हृदयांत प्रेमाचा ओलावा होता. अनेकदां तो अपयशी ठरला असला तरी त्याच्या ठिकाणीं अंतःकरणाचा उदारपणा होता. जो अधिकारी त्याच्याशीं कर्तव्य म्हणून कां होईना कठोरपणें वागत होता, त्याच्यासाठीं आपले प्राणहि धोक्यांत घालण्यास तो तयार होता !

★

कोणत्याहि माणसाच्या केवळ बाह्य स्वरूपावरून त्याच्या संबंधीं आपलें मत आपण बनविलें तर आपण किती मर्यादेपर्यंत चुकूं शकतो हें दाखवून देणारी आणखी एक अशीच कैद्याची गोष्ट आहे.

'गियाना' च्या आंतरभागांतील 'मारोनी' या उंचवटयाच्या प्रदेशांतील सोन्याच्या खाणीमध्यें, तुरुंगांतून सुटून आलेल्या दोन कैद्यांना, एका सोनें खणणाऱ्यानें कामावर ठेवलें. हळुहळु त्यांच्यावर अधिका-यांचा विश्वास बसला. वाळूंतील रासायनिक द्रव्यांच्या परिणामामुळें बनलेलें अशुद्ध स्वरूपांतील सोनें व सोन्याची वाळू देऊन त्यांना तो दरसाल विक्रीसाठीं बाजारपेठेंत पाठवत असे. त्यांतल्या त्यांत जवळ अशी एक बाजारपेठ होती. तरी नदींतून जाऊन तेथें पोंचण्यास कधीं कधीं महिना महिना लागे.

तुरुंगांतून सुटलेल्या त्या दोघा कैद्यांनीं एकदां पळून जावयाचें ठरविलें. कारण त्यांच्यासारखी शिक्षा झालेल्या कैद्यांना शिक्षा भोगल्यानंतरहि आपल्या घरीं जाण्याचें स्वातंत्र्य नसें. पुष्कळदां त्यांना मरेपर्यंत तेथेंच प्रायश्चित्त-गृहांत रहाणें भाग पडे. 'गियाना' हा प्रदेश तर ओसाड, मागासलेला, त्यांत अनेक ठिकाणीं दलदली आणि घनदाट अरण्यें माजलेलीं. त्यामुळें कैद्यांना आजारानें जर्जर होऊन किंवा उपासमारीनेंहि मरण्याची नेहमींच भीति असावयाची.

म्हणूनच त्यांच्यांतील बरेचसे कैदी संधि सांपडतांच तेथून पळून जाण्याचा प्रयत्न करीत.

यामुळेंच सोन्याच्या खाणीमधील त्या दोन नोकरांनींहि संधीचा फायदा घेऊन त्यांना दिलेल्या नावेंतून नदीच्या दुसऱ्या तीरावरील हॉलंडच्या वसाहतींत पळून जाण्याचें ठरविलें.

परंतु पळून जाण्यापूर्वी मालकाचें सर्व सोनें त्यांनीं सुरक्षित जागीं ठेवलें व त्याला पत्र लिहून त्या ठिकाणच्या खाणाखुणा त्यास कळविल्या.

पत्रांत त्यांनीं लिहिलें,"महाराजांनीं आमच्यावर नेहमींच दयादृष्टि ठेवली होती. आम्ही आतां आमच्या चांगल्यासाठींच पळून जात असलों, तरीहि आपण विश्वासानें जें सोनें आमच्या स्वाधीन केलें होतें तें चोरून आपणांस लुबाडण्यास आमचें मन होत नाहीं."

येथें ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, पूर्वी एकदां त्या दोघांनाहि चोरीच्या गुन्ह्या-बद्दल शिक्षा झालेली होती. अर्थात् त्यांच्या हातीं असलेल्या सोन्याच्या साह्यानें ते चांगलेंच नशीब काढूं शकले असते. पण त्यांच्या अंतःकरणांत कांहीं प्रामाणिकपणा आणि सरळपणा होता ! ज्यांना त्यांची पूर्वीची हकीकत माहीत होती त्यांनीं, त्या पूर्व इतिहासावरून ते दोघे दुष्ट, कुचकामी गुन्हेगार आहेत असाच निर्णय दिला असता. पण ज्यानें त्यांच्यावर विश्वास टाकला त्याच्या बाबतींत तेच गुन्हेगार, अंगीं अनेक दोष असूनहि विश्वासार्ह ठरूं शकले.

मुलांनो, आपण विचार करतांना उदार आणि दूरदर्शी असलें पाहिजे. आपल्याच मानव-बांधवांविषयीं उतावीळपणानें, घाईघाईनें आपण निर्णय देतां कामा नये; किंवा त्यापेक्षांहि शक्यतर कोणाबद्दलहि कसलेंच, बरें-वाईट मत बनविणें आपणास टाळतां आलें तर तें सर्वांत उत्तम.

—श्रीमाताजी.

CWMCE Vol 02 : Page 220

भगवन्ताशीं तादात्म्य अनुभवावयाचें व आपल्या जीवनांत त्याचाच आविष्कार करावयाचा येवढें उच्चतम ध्येय ज्याच्यासमोर आहे त्याच्यावर सामान्य जीवनांतील मूढता व निरर्थकता यांचा काय परिणाम होणार ?

★

प्रत्येकाकडून त्याच्याजवळ जें कांहीं आहे व तो जें कांहीं आहे तेवढेच मागितलेलें आहे; अधिक कांहींहि नाहीं, पण कमीहि नाहीं.

CWM : Vol 16 : Page 170

★

—श्रीमाताजी.

# श्रीमाताजींचीं प्रवचनें

## १

## जननिंदा

**निंदेकडे दुर्लक्ष कसें करावयाचें ?**

आपण आपली स्वतःची जाणीव व्यापक केली पाहिजे; अधिक व्यापक दृष्टिकोनांतून घटनांकडे पाहिलें पाहिजे. एकाद्या प्रसंगाला तुम्हांला तोंड द्यावयाचें आहे, एकाद्या मोठ्या संकटाशीं सामना दिल्याखेरीज गत्यंतरच नाहीं असा क्षण आला आहे तर त्यावेळीं तुम्ही असा विचार करावयास सुरुवात करा कीं, आजपर्यंत हजारों, लाखों वर्षांचा काळ लोटून गेला आहे आणि यापुढेंहि हजारों वर्षांचा काळ आहे. या विचारानें अत्यंत कठीण वाटणारा क्षण अगदींच क्षुल्लक असल्याचा अनुभव तुम्हांस तत्काळ येईल. याकरितां फार उच्च अशी अवस्था प्राप्त करून घेण्याची आवश्यकता नाहीं. फक्त अनंत काळापासून आलेल्या घटना, पुढें होणाऱ्या आणि चालू काळांतील, चालू क्षणीं घडत असलेल्या घटनांचा तुम्ही नुसता विचार करा. कोणीहि शहाणा माणूस सहज उद्‌गार काढील कीं, "हो, खरेंच अगदींच क्षुद्र गोष्टीला मी फारच महत्त्व देत आहे."

अशारीतीनें या सृष्टींतील अनंत अगण्य घटना नुसत्या डोळ्यासमोर आणतांच तुम्हांला कठीण वाटणारा प्रसंग तेथल्या तेथें विरून जाईल. याठिकाणीं फार मोठ्या आध्यात्मिक अवस्थेविषयीं मी बोलत नाहीं. स्थलकालामध्यें निर्माण झालेला प्रचंड पसारा आणि त्या मानानें तुमच्या समोरच्या एकाद्या लहानशा प्रसंगाला अगदीं जिवाभावाचा, आणीबाणीचा समजून, तुम्ही जें फार महत्त्व देत असतां, त्याविषयीं मी बोलत आहे. खरोखर, त्या गोष्टीचा जर तुम्ही अंतःकरणपूर्वक विचार केला, योग्य दृष्टीनें, सरळ अंतःकरणानें त्याकडे पाहिलेंत तर त्याचा कठीणपणा ताबडतोब नाहींसा होऊन जाईल. अर्थात् तुमच्याच मनाचा एक भाग अशावेळीं पुढें येऊन आग्रहानें म्हणू लागेल कीं," मग, माझ्या दृष्टीनें ही गोष्ट महत्त्वाची आहेच मुळीं !" पण अशावेळीं त्या भागाकडे दुर्लक्ष करून तुमच्यांतील अधिक ज्ञानोन्मुख, समजुतदार व जाणत्या भागाकडे तुम्ही लक्ष द्या. तुम्ही जर शुद्ध, सत्यप्रिय, सरळ असाल तर तुम्हाला ही गोष्ट कठीण जाणार नाहीं.

दुसऱ्याहि कांहीं पद्धती आहेत. एकदां मीं तुम्हाला वाचून दाखविलें होतें, त्यांत त्या चिनी साधूनें असा मार्ग सांगितला होता कीं, सागरामध्यें एकाद्या फळीवर तरंगत पडून राहिल्याप्रमाणें घटनांच्या प्रवाहावर स्वस्थ पडून रहा. अनंत विशालतेमध्यें लाटांवर आपण हेलावत आहोंत अशी कल्पना करा आणि हें करीत असतांना वर पसरलेल्या अथांग आकाशावर चित्त एकाग्र करा. चिनी भाषेमध्यें याला 'वू वुई' असें म्हणतात. असें तुम्ही करूं शकलांत तर तुमचीं सारीं दुःखें मावळून जातील; सारे कष्ट नाहींसे होतील.

माझ्या माहितीचा एक आयरिश मनुष्य असें करीत असेः काळोख्या रात्रीं आकाशांत जेव्हां चांदण्या असत तेव्हां उताणें निजून तो आकाशाकडे एकसारखें पहात राहून ध्यानमग्न होत असे, चिंतनांत गढून जात असे. चमचमणाऱ्या असंख्य तारकांनीं खच्चून भरलेल्या त्या विशाल आकाशांत आपण तरंगत आहों अशी भावना तो करीत असे. त्यामुळें त्याचे सर्व दुःख-कष्ट तत्काळ नाहींसे होऊन जात. अशाच आणखी कितीतरी पद्धती आहेत. या सर्वांचा उद्देश हा आहे कीं, त्यामुळें तुलनात्मक दृष्टीनें तुमच्या हें लक्षांत यावें कीं, तुमच्या लहानशा व्यक्तिमत्त्वाला, तुमच्या विषयींच्या क्षुल्लक गोष्टींना तुम्ही कितीतरी अवास्तव महत्त्व देत असतां, आणि त्या मानानें पाहिलें तर हें विश्व कितीतरी पटीनें, अनंत पटीनें महान्, विशाल असें अस्तित्व आहे.

अर्थात् जड भौतिक, पार्थिव जाणीवेपासून स्वतःला अलग समजून उच्चतर चेतनेमध्यें प्रवेश करण्याचा दुसराहि एक मार्ग आहे. याठिकाणीं भौतिक, पार्थिव वस्तूंना व घटनांना त्यांचें योग्य मूल्य, योग्य स्थान प्राप्त होतें; म्हणजेच त्यांचें लघुत्व, अल्पत्व, क्षुद्रत्व त्यामुळें आपल्या लक्षांत येतें.

CWMCE Vol 07 : Page 396

२

## शारीरिक दुःखावर मानसिक उपाय

"जेव्हां एकादा आजार अथवा रोग शरीरांत निश्चितपणें कोणत्यातरी एका ठिकाणीं केंद्रित झाला असेल तेव्हां आपली जड भौतिक चेतना उन्मुख करून रोगनिवारक शक्तीला आपल्या शरीरांत कशी वाट करून द्यावयाची ?"

हा विषय जवळ जवळ गूढविद्येसारखाच आहे. तेव्हां या बाबतींत प्रत्येकानें आपली पद्धति शोधून काढली पाहिजे. कारण प्रत्येकाची ज्या कोणत्या पद्धतीनें योग्य ती पूर्वतयारी झालेली असेल व ज्या पद्धतीशीं तो सर्वांत अधिक परिचित असेल तीच पद्धत त्याच्या बाबतींत अत्यंत परिणामकारी ठरते.

तरीपण या पूर्वतयारीसाठीं सर्वसामान्य रूपरेषाहि सांगतां येईल.

शरीराला सामान्यतः एक गोष्ट सहजासहजीं समजत नाहीं. तरी त्याला पद्धतशीर रीतीनें अभ्यास देऊन हें समजावून दिलें पाहिजे कीं, आपल्या खऱ्याखुऱ्या व गूढ अशा स्वरूपाचें बाह्य प्रकटीकरण म्हणजे हें शरीर आहे व त्यावर सर्वप्रकारें प्रभुत्व त्या निगूढ सत्तेचेंच आहे.

लहान मुलाला ज्याप्रमाणें निरीक्षण, अभ्यास व समज या द्वारां किंवा प्रत्यक्ष उदाहरण दाखवून कांहीं गोष्टी आपण शिकवतो, त्याप्रमाणें शरीरालाहि आपण शिकवूं शकतो. अशारीतीनें आपणां स्वतांमधील क्रिया, हालचाली, उर्मी यांचें निरीक्षण करून किंवा दुसऱ्यांमधील

क्रिया व हालचाली यांचें निरीक्षण करून हें ज्ञान आपल्या शरीराला होऊं शकतें. अर्थात् स्वतःमधील निरीक्षण करण्याच्या दृष्टीनें आपण कांहींसें आंधळयासारखेच असतो म्हणा! या बाबतींत कांहीं अभ्यास-प्रकार सर्वमान्य झालेले आहेत त्यांचा उपयोग करून व ज्या गोष्टी संशयातीत, स्पष्टपणें प्रत्ययास येणाऱ्या आहेत त्यांचा आधार घेऊन ही पूर्वतयारी करतां येईल.

आतां येथें उदाहरणच घेऊन पाहूं. निरनिराळ्या व्यक्तींना एकाच परिस्थितींत ठेवलें असूनहि त्यांना त्याचे अगदीं भिन्न भिन्न परिणाम अनुभवास येतात, भोगावे लागतात. येवढेंच नव्हे तर कांहींना एकच परिस्थिति प्राणघातक ठरते, तर त्याच परिस्थितींत दुसऱ्यांच्या केंसा-लाहि धक्का लागत नाहीं, ते सुरक्षितपणें त्यांतून पार पडतात.

युद्धाच्या काळांत अशा प्रकारचीं कितीतरी उदाहरणें घडलेलीं आहेत. त्यांचा आपल्या अभ्यासास चांगला उपयोग होईल. रोगांच्या सांथी, जलप्रलय, भूकंप व वादळें या सारख्या निसर्गाच्या उत्पात्-प्रसंगींहि अशीं कित्येक उदाहरणें घडलेलीं आपण पाहतों. लहान मुलाला एकादी गोष्ट दाखवून, प्रत्यक्ष घडलेलें उदाहरण सांगून जसें समजावून सांगतां येतें तसेंच आपल्या शरीरालाहि या गोष्टी समजावून सांगतां येतात "हें पहा, केवळ शरीर वांचले म्हणून वांचलें असें नव्हे, तर तेथें दुसऱ्याच कोणत्या तरी शक्तीनें कार्य केलें म्हणून वांचलें बरें!" असें देहास समजावून सांगितलें तर, ह्या सर्व गोष्टी शरीर जाणून घेऊं शकतें.

हा पूर्वतयारीचा एक भाग झाला.

ह्या समजुतीचा थोडा थोडा अभ्यास, परिपाठ चालूं ठेवून त्याबरोबर शरीराच्या प्रत्येक पेशीची ही धारणा तुम्ही हळु हळु वाढविली पाहिजे; आणि त्याचबरोबर त्याला वांचविणाऱ्या तारक दिव्यशक्तीच्या सान्निध्याविषयींची श्रद्धाहि त्याच्या पेशीपेशींत तुम्ही दृढमूल केली पाहिजे. अर्थात् ह्या कामाला फार वेळ लागतो; तरीपण हें काम पद्धतशीर व अखंडपणें केलें तर त्याचा परिणाम मात्र झाल्याशिवाय रहात नाहीं.

हें काम झालें म्हणजे पुढच्या कार्याची भूमि तयार झाली असें म्हणतां येईल.

समजा शरीरांत विशिष्ट जागीं दुःख आहे. तुम्ही नेहमीं जी भूमिका घेण्याची संवय लावून घेतली असेल त्याप्रमाणें अशा दुःखप्रसंगीं तुमची प्रतिक्रिया होईल. आपण एक उदाहरणच घेऊ.

कोठेंतरी दुःख आहे. खूप ठणका लागला आहे. फारच सोसावें लागत आहे. अशावेळीं त्या दुःखावरच लक्ष केंद्रित करूं नका. असे म्हणूं नका, "ओहो! किती हें दुःख मला होत आहे. अगदीं सोसण्याच्या पलीकडचे आहे हें दुखणें. हाय, हाय, दुखणें तर वाढतच चाललें आहे. आतां काय करूं. कसें मी हें सोसणार? आतां नाहीं सोसवत. चालला प्राण माझा....."अशारीतीनें तुम्ही जों जों विचार कराल तों तों खरोखरीच तुम्हांला तसें वाटूं लागेल, त्या दुःखाकडे तुमचें लक्ष अधिक वेधलें जाईल. तेथें तुमचें मन एकाग्र झाल्यामुळें खरोखरीच तें दुःख कल्पनातीत वाढूं लागेल.

म्हणून पहिली गोष्ट ही कीं, अशा वेळीं तुम्ही स्वतःवर चांगलाच ताबा ठेवला पाहिजे.

दुसरी गोष्ट म्हणजे मी वर सांगितल्याप्रमाणें तुमच्या संवयीचा हा प्रश्न आहे.

एकाग्र कसें व्हावयाचें, शांत कसें रहावयाचें आणि मानसिक, प्राणिक वा आंतरात्मिक

शांति स्वतःमध्यें कशी उतरवावयाची हें जर तुम्हाला माहीत असेल तर या प्रत्येक प्रकारच्या शांतीच्या मौलिकतेप्रमाणें व विशेष गुणाप्रमाणें, तुमच्यावर खात्रीनें आश्चर्यकारक परिणाम होईल, नंतर तुम्ही त्या शांति-शक्तीशीं जागता संबंध जोडूं शकाल किंवा ती शांति स्वतः-मध्यें प्रस्थापित करून त्या स्थितींत राहूं शकाल.

समजा, या बाबतींत तुम्ही कांहीं प्रमाणांत यशस्वी झालांत; तुम्ही आपणांमध्यें शांति ओढून आणून ती खालीं सूर्यकमळापर्यंत उतरवूं शकलांत––(या ठिकाणीं आपण शांतीची नुसती आंतरिक अवस्था गृहीत धरलेली नसून शारीरिक शांतावस्था आपण अपेक्षीत आहोंत) ––पुनः तेथून ती अगदीं संथपणानें हळु हळु, मंदगतीनें पण, मी म्हणेन, अगदीं अट्टाहासानें, दुखणाऱ्या, ठणकणाऱ्या भागाकडे, बिंदूकडे नेऊन त्यावर स्थिर करूं शकलांत तर कितीतरी काम झालें असें होईल. अर्थात् इतकें सुद्धां जमणें नेहमींच पुरेसें होत नाहीं.

पण आतां हीच प्रक्रिया जास्त जोरदार करून त्याला तुम्ही मनाच्या चिंतनाची जोड दिली व जणुं जिवंत आणि प्रभावी स्वरूपांत हें चिंतन चालवून शरीरावर असे बिंबविलें कीं, सर्वत्र केवळ एका सत् तत्त्वाची, दिव्यशक्तीचीच सत्ता आहे आणि त्याच सत्तेचें कांहींसें विकृत असें प्रकटीकरण म्हणजेच आपल्या शरीरांतील या पेशी होत. या अशा संस्कारानें, तुमच्या तीव्र इच्छाबलाच्या व एकाग्रतेच्या प्रभावानें त्या एकमेव सत्याचें, दिव्य सत्तेचें स्पष्ट भानहि शरीराच्या प्रत्येक पेशींत तुम्ही आणूं शकाल आणि मग––सर्व विकृति नाहींशी झाल्या-शिवाय रहाणार नाहीं.

यानंतर, या दोन प्रक्रियांना आणखी एका भावनात्मक प्रक्रियेची जोड दिलीत, म्हणजेच परमेश्वरी कृपासामर्थ्यावर पूर्ण विश्वास ठेवून त्या कृपाशक्तीस आत्मदान करण्याचा प्रयत्न केलांत, तर तुमचें दुःख नाहींसें होण्यास पांच मिनिटें सुद्धां लागणार नाहींत.

हें सर्व खरें असलें तरी सुरुवातीला प्रयत्न करूनहि तो यशस्वी होईलच असें नाहीं. ठीक आहे. तरीपण पुनःपुनः सुरुवात करा, नवीन उत्साहानें पुनः प्रारंभ करा. या तिन्हीं प्रक्रिया करण्यांत तुम्हांला यश येईपर्यंत यत्न करीत रहा.

अशा एकत्रित प्रभावी प्रक्रियेला न जुमानणारें दुःखच या जगांत नाहीं.

कदाचित् एकदां थांबलेलें दुःख पुनः कांहीं काळानंतर उद्भवूं शकेल; नाहीं असें नाहीं. तरीपण दुःखाची परत उद्भवण्याची संवय अजिबात मोडून जाईपर्यंत वर सांगितलेला प्रयोग एकसारखा दर वेळीं करीत जा.



३

## जीवनाचें रहस्य

हें विश्व कशासाठीं आहे? निदान ज्या पृथ्वीशीं आपला एवढा संबंध आहे, जी आपल्याला इतकी विश्वसनीय वाटते ती तरी कशासाठीं आहे? हे प्रश्न तुम्हीं स्वतःला

कधींतरी विचारून पाहिले आहेत काय? तुम्ही त्या फंदांत कधीं पडलाच नसलांत तर कदाचित् एक मोठी शहाणपणाचीच गोष्ट तुम्हीं केलीत! एक गूढविद्यातज्ज्ञ थेऑं यांच्याविषयीं मी तुमच्याशीं एकदां बोललें आहे. ते आपल्यापरी खरोखरीच एक ऋषी होऊन गेले. लोक त्यांच्याकडे येऊन प्रश्न विचारीत. 'हें विश्व कशासाठीं आहे?' हा प्रश्न अनेकजण विचारीत. 'पण त्याचें तुम्हाला काय?' हें त्यावर त्यांचें उत्तर असें. कांहीं म्हणत, 'हें विश्व असें का आहे?' त्यावर ते म्हणत, 'आहे तें आहे; त्याचें तुम्हाला काय?' तसेंच, 'हें जग तितकेंसें कांहीं समाधानकारक नाहीं,' असा इतरांचा अभिप्राय पडे. हाच खरा मुद्दा आहे. हें जग असमाधानकारक आहे असें ज्यांना आढळून आलें आहे, त्यांना मी म्हणेन, "उठा, कामाला लागा, जगांत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करा, जगाची आजची स्थिति आहे त्यापेक्षां ती निराळी व्हावी, त्यापेक्षां ती चांगली व्हावी म्हणून उपाय शोधून काढा. वस्तुस्थिति ही अशी आहे आणि ती तशी आहे असें म्हणून केवळ तर्कवितर्क करण्यांत, चिंताकुल होण्यांत हंशील काय? परिस्थितीवर इलाज करतां येईल अशीं साधनें शोधून काढा म्हणजे ती जशी हवी आहे तशी आदर्श करतां येईल. आहे ही वस्तुस्थिति अशीच कां आहे, याविषयींचें कारण जाणतां येणें शक्य नाहीं असें नव्हे; पण त्याविषयीं आपणांस खात्री देतां येणार नाहीं. सर्वांत उत्तम मार्ग हा कीं, वस्तुस्थिति जशी आहे तशी स्वीकारावयाची आणि ती आदर्श करण्याच्या दिशेनें प्रयत्न करीत रहावयाचें. गंमत अशी आहे कीं, जर जाणून घेण्याची तुमची इच्छा प्रामाणिक, मनःपूर्वक असेल व तसे प्रामाणिकपणें तुम्ही प्रयत्न कराल तर, आहे ही वस्तुस्थिति तशी कां आहे हें तुम्हांला समजून येईल; तिचें मूळ कारण, आद्यस्थान आणि पद्धति हें सर्व कांहीं समजून येईल. कारण, त्याचें सर्वांचें मूळ आहे एकच. वस्तुस्थितीच्या मुळाशीं एकच एक सत्य आहे. त्या सत्याच्या अभावीं कांहींच अस्तित्वांत आलें नसतें. जर तें सत्य तुम्हीं बरोबर ओळखलेंत तर तुम्हांला सृष्टीचें मूळ, तसेंच सृष्टींत घडवून आणावयाच्या बदलाचीं साधनें यांचेंहि ज्ञान आपोआपच होईल. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर, भगवंत हा साऱ्या सृष्टीचा आधार. तुम्हांला या भगवत्संयोगाचा लाभ होईल तर साऱ्या घटनांची गुरुकिल्लीच तुमच्या हातीं येईल; परिस्थितींत जो बदल घडवून आणावयाचा आहे त्याचें कारण, साधनें नि पद्धति समजून येईल. म्हणून प्रत्यक्ष काम करावयास लागणें, भगवत्संयोग प्राप्त करून घेण्याच्या मार्गास लागणें ही पहिली गोष्ट. पण जगांत किंवा जगाकरितां काम करणें हें अतिकठीण आणि तुमच्या आवांक्याबाहेरचें काम आहे असें तुम्ही म्हणाल. असें वाटत असेल तर मग स्वतःपासूनच सुरुवात करा. तुम्ही एक विशिष्ट घटक आहांत; विश्वाचें एक प्रतीक अथवा प्रतिनिधि आहांत, एक अंश आहांत. त्यास आकार देणें, विशिष्ट रूप देणें हें तुमचें काम समजा. त्या कामावर एकाग्रता करा. अंतरंगांत प्रविष्ट व्हा.—त्या चिमुकल्या अंतरंगांतहि तुम्ही दीर्घकाल शोधत असलेली ती गुरुकिल्ली तुम्हांस निश्चित गवसेल.

—श्रीमाताजींच्या प्रवचनाधारें

CWMCE : Vol 05 :Page 40-41

# मैत्रेयी–एक प्रतीक

How shall I rest content with mortal days
And the dull measure of terrestrial things...?
How long shall our spirits battle with the Night
And bear defeat and the brute yoke of Death...?

SRI AUROBINDO—*Savitri*, B. III C. I

All is too little that the world can give:
Its power and knowledge are the gifts of Time
And cannot fill the spirit's sacred thirst.

SRI AUROBINDO—*Savitri*, B. III C. IV

या भाग्यशाली भारतानें वेदकाळापासून विदूषी व वीरांगना, तपस्विनी व ज्ञानवती, सुशीला व पतिव्रता अशा थोर आर्यनारींची आदर्श मालिका अव्याहतपणें गुंफलेली आहे. भारताच्या आत्मशक्तीनें अनेक विभूतींच्या रूपानें स्वत:ला अभिव्यक्त केलेलें आहे. सीता व सावित्री, दमयंती व द्रौपदी, शकुंतला व शर्मिष्ठा, गार्गी व गांधारी इत्यादि नारींनीं आपल्या ज्ञानानें, पावित्र्यानें व तप:प्रभावानें भारताची अस्मिता इतकी कांहीं भारून टाकलेली आहे कीं, हजारों वर्षांनंतर आजहि ज्या ज्या वेळीं यांचें स्मरण करावें तेव्हां प्रेमानंदानें व आदरातिशयानें शरीराचा अणुरेणू पुलकित व्हावा, आणि त्यांच्या स्मृतीला प्रत्येकानें नकळत नतमस्तक होऊन अभिवादन करावें.

या स्मृतिमांगल्यांत मैत्रेयीचें व्यक्तित्त्व आम्हांला विशेषेंकरुन एकमेवाद्वितीय व निरुपम असें वाटतें.

वेदमूर्ति महामना याज्ञवल्क्याच्या दोन भार्या होत्या. मैत्रेयी व कात्यायनी. जनकाच्या यज्ञसभेंत तत्कालीन ब्राह्मण पंडितांमध्यें ज्ञानानें व ब्रह्मतत्त्वनिरुपणानें याज्ञवल्क्य ज्याप्रमाणें सर्वश्रेष्ठ गणलें गेले होते, त्याचप्रमाणें मैत्रेयीची उत्कट पतिपरायणतासुद्धां आसमंतांत सर्वपरिचित झाली होती. इहलोकींच्या प्राप्तसुखांचा मनसोक्त आस्वाद घ्यावा ही कात्यायनीची स्त्रीसुलभ भावना होती. या उलट मैत्रेयी होती ब्रह्मवादिनी. कसल्यातरी गूढ चिंतनांत ती सदैव मग्न असे. गृहकर्में करीत असतांना देखील तिच्या अंत:करणांत विविध प्रश्नोपप्रश्नांची खळबळ चालत असे :

मनुष्य सुखप्राप्तीसाठीं अव्याहत धडपडतो, पण प्राप्त सुखांपासून त्याला चिरंतन शांति, पूर्णत्वाचा स्थायीभाव मात्र मिळत नाहीं, असं कां व्हावं ? भोग, ऐश्वर्य, गौरव, यशोमान—

पृथ्वीकडून मिळणाऱ्या या अत्युच्च सुखांपासून प्राणाच्या खळखळणाऱ्या प्रवाहाला अंतिम स्थिरता कां बरं नाहीं मिळत ? मानवी जीवनाची ही क्षुधा, ही पिपासा कशानें शमणार ? ही शोचनीय शून्यता, ही पोकळी कशानें भरून निघणार ?

गृहस्थाश्रमाचा त्याग करून परिव्राजक व्हावयाचें याज्ञवल्क्यांनी ज्या दिवशीं ठरविलें, स्वतःच्या संपत्तीचे स्थावर व जंगम असे दोन भाग करून मैत्रेयी व कात्यायनीला देण्याचा आपला संकल्प ज्या दिवशीं त्यांनी बोलून दाखविला त्याच दिवशीं मैत्रेयीच्या सर्वांगांत जळणाऱ्या अभीप्सेच्या ज्वालामुखीचा चिरस्मरणीय असा स्फोट झाला.

"भगवान्" मैत्रेयी म्हणाली, "ही समस्त पृथ्वी जर ऐश्वर्यानें ओतप्रोत झाली तर तद्वारां काय मी अमर होऊं शकेन ?"

" नाहीं मैत्रेयी, नाहीं. संपत्तीपासून अमृताची मुळींच आशा नाहीं."

" तर मग संपूर्ण पृथ्वीचें राजत्व जरी मला मिळालं तरी मला त्याचा काय उपयोग ? सुखोपभोगाच्या ज्या ह्या वस्तू मला अमरता देऊं शकत नाहींत त्या घेऊन काय करूं मी ? येनाहं नामृता स्यां किमहं तेन कुर्याम् ?"

" भद्रे, ही सर्व धनसंपत्ति तुला अमरता देणार नाहीं हें तर खरंच, पण इतरेजनांप्रमाणें विषयोपभोगाची तहान भागविण्याची क्षमता यामुळें नाहीं का प्राप्त होणार ?"

"आर्य ! असार व अनित्य अशा विषयोपभोगाची मला मुळींच इच्छा नाहीं. तुमच्या संपत्तीचा बहुमोल वांटासुद्धां मला नको. ज्या ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीनें मनुष्य चिरंतन सुखाचा अधिकारी होतो, ज्याच्या प्रकाशानें आत्मज्योति ब्रह्मतेजांत विलीन होऊन जाते त्या ब्रह्मज्ञानाचें शाश्वत धन मला द्या. यदेव भगवान्वेद तदेव मे ब्रूहीति."

मानिनीचे हे तेजस्वी उद्‌गार ऐकून याज्ञवल्क्यांच्या आनंदास पारावार उरला नाहीं. निरनिराळे दृष्टांत देऊन त्यांनी मैत्रेयीला ब्रह्मतत्त्वाचा उपदेश दिला.

याज्ञवल्क्य प्रव्रज्या घेऊन निघून गेले, आणि मैत्रेयी पतीच्या उपदेशानुसार प्रशांत चित्तानें कठोर साधना करीत राहिली. अभीप्सा पूर्तीसाठीं, अमृतत्त्वलाभासाठीं पार्थिव, असार व नश्वर सुखोपभोगांवर लाथ मारणाऱ्या या साध्वीनें आपलें सर्वस्व अर्पण केलें. तिच्या मनाचे सारे विचार, तिच्या प्राणाचे सारे आवेग, तिच्या साऱ्या प्रक्रिया एकाच आदर्शाकडे प्रधावित झाल्या आणि तिच्या सत्तेचे समस्त स्वर एकवटून एक आर्त प्रार्थना आविर्भूत झाली—

" असतो मा सत् गमय,  
तमसो मा ज्योतिर्गमय,  
मृत्योर्मामृतङ्गमय,  
रुद्र यत्ते दक्षिणं मुखम्  
तेन मां पाहि नित्यम् ।

असत्यापासून मला सत्याकडे ने, अंधकारापासून प्रकाशाकडे ने, मृत्युपासून मला अमृतत्वाकडे घेऊन जा. हे प्रकाशस्वरुपा, तूं माझ्यांत प्रकाशित हो. हे रुद्रा, तुझें प्रसन्नवदन मला दाखव. तें प्रसन्नवदनच माझें रक्षण करो."

जीवनाच्या प्रत्येक आघाडीवर आजच्या मानवाची दारुण ओढाताण चालली आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक व आध्यात्मिक इत्यादि सर्वच क्षेत्रांतील सारे आदर्श, सारीं पायाभूत तत्त्वें, सारीं जीवनमूल्यें जणुं भंगून गेलीं आहेत. मानवाची विफलता आज रडत आहे, आक्रंदत आहे. कारण हा संधिकाल आहे. पृथ्वीच्या इतिहासाच्या आजच्या पानांवर सुवर्णाक्षरांनीं कांहींतरी लिहिलें जात आहे. कांहींतरी नूतन प्रगट होऊं पाहात आहे. अनंत अन् सांत यांच्यामधली लोखंडी भिंत भेदून कसल्यातरी अज्ञाताची मूर्तिमंत ज्योति बाहेर येऊं पाहात आहे. म्हणूनच नवनिर्मितीच्या क्षितिजावर उभ्या असलेल्या, नित्य नवीन व सदैव कल्पनातीत वास्तव्याचा शोध घेणाऱ्या मानवाच्या अंतरांतून अभावितपणें एकच प्रार्थना उद्भूत होत आहे—

**मृत्योर्मामृतङ्गमय ।**

मृत्युपासून मला अमृताकडे घेऊन जा.

जीवनांत चरम शांति व चरमतृप्ति मिळावी म्हणून मानवाच्या हृदयांत आजच्या संक्रमणकाळीं जी कांहीं तीव्र व उत्कट इच्छा उभ्दवू शकते, ती मैत्रेयीच्या या कांहीं ओळींतच व्यक्त झालेली आहे. नाविन्याचा शोध घेणाऱ्या मानवाच्या अभीप्सेंत जी मैत्रेयी प्रतीकरूपानें चिरंतन व चिरंजीव होऊन राहिलेली आहे तिला सत्ययुगाच्या या उषःकाली शतशः अभिवादन !

—गजराज.

# अडचणींमध्यें असतांना

प्रथमावस्थेंत नेहमींच संकटें येतात, प्रगति कुंठित होते आणि आंतरिक द्वारें उघडण्यास विलंब लागतो; पण हें सर्व व्यक्तीची तयारी होईपर्यंत. ध्यानावस्थेंत असतांना जर तुम्हांला स्थिरतेचा अनुभव येत असेल, आंतरिक प्रकाशाचें मधून मधून ओझरतें दर्शन होत असेल आणि वृत्तीची अंतर्मुख ओढ जर इतकी वाढली असेल कीं, त्यामुळें बाह्य जगाची पक्कड कमी होऊन प्राणशक्तीच्या अस्वस्थतेचा जोर क्षीण झाला आहे तर, तें सुद्धां आधींच बरीचशी प्रगति झाल्याचें द्योतक आहे. योगमार्ग हा दीर्घ मार्ग असून त्यांत तीव्र प्रतिकाराला तोंड देत देत तसूतसूंनीं भूमि जिंकावी लागते. त्यासाठीं सर्वांत कोणत्या गुणांची अधिक आवश्यकता असेल तर ते म्हणजे धीर, सारे मन एकवटून केलेले सतत प्रयत्न आणि साऱ्या संकटांत, विलंबांत आणि वर वर पहातां अपयश म्हणून वाटणाऱ्या प्रसंगांतहि अचल, दृढ रहाणारी श्रद्धा.

* * *

साधनेच्या पहिल्या अवस्थेंत अशा तऱ्हेचे अडथळे हे येतातच. ह्याचें कारण हें कीं

अजून तुमची प्रकृति पुरेशी ग्रहणशील झालेली नाहीं. अडथळा कोठें आहे, मनांत कीं प्राणशक्तीच्या क्षेत्रांत, हें तुम्हीं प्रथम शोधून काढलें पाहिजे, नंतर तेथें आपली चेतना अधिक व्यापक करण्याचा यत्न केला पाहिजे; अधिकाधिक पावित्र्य व शांति यांना आंतमध्यें आवाहन केलें पाहिजे आणि अशा पावित्र्यपूर्ण व शांतियुक्त अवस्थेमध्यें आपल्या अस्तित्वाचा तो तो भाग दिव्यशक्तीस अंतःकरणपूर्वक व पूर्णपणें अर्पण केला पाहिजे.

* * *

प्रकृतीचें प्रत्येक अंग आपल्याच जुन्या वळणानें जाऊं इच्छितें आणि आमूलाग्र बदल व प्रगति यांचा स्वीकार करण्याचें शक्य तितकें टाळत असतें. कारण त्यामुळें त्याला स्वतःपेक्षां उच्च अशा कोणत्यातरी शक्तीच्या आधीन व्हावें लागेल व त्याला त्याच्या स्वतःच्या क्षेत्रांतील, स्वतःच्या स्वतंत्र साम्राज्यांतील सार्वभौमत्वाला मुकावें लागेल. याच कारणामुळें रूपांतराचें कार्य इतकें दीर्घ आणि कठीण होऊन बसतें.

मनावरहि एकप्रकारचें शैथिल्य आल्यासारखें भासतें. कारण त्याच्या खालच्या भागांत भौतिक-मन (Physical mind) असून त्याचा स्वभावच मुळीं तामसिक अथवा जड आहे–कारण भौतिक पदार्थांचें मूलभूत तत्त्व जडता हें आहे. एकसारख्या आणि दीर्घकाळपर्यंत उच्चतर अनुभूती येत गेल्या तर मनाच्या या भागामध्यें थकवा आल्यासारखा वाटतो किंवा अस्वस्थता व मंदपणा या स्वरूपाची प्रतिक्रिया येते. यांतून सुटण्याचा एक उपाय म्हणजे समाधि लावणें हा आहे. त्यायोगें शरीर स्थिर केलें जातें, भौतिक मन ग्लानींत असल्यासारखें रहातें, व आंतरिक चेतना समाधि-स्थितींतील आध्यात्मिक अनुभव घेण्यास स्वतंत्र सोडलेली असते. परंतु याचा एक तोटा म्हणजे समाधि अनिवार्य होऊन बसते व जागृतींतील जाणीवेचा, समाधिबाह्य कालांतील जाणीवेचा प्रश्न तसाच अनिर्णीत राहून जातो; ती जाणीव तशीच अपूर्ण रहाते.

* * *

आपल्या ठिकाणीं कोणत्या चुकीच्या प्रवृत्ती आहेत यांचें तुम्ही निरीक्षण करणें आणि त्या जाणून घेणें आवश्यक आहे; कारण त्यांतच तुमच्या दुःखाचें मूळ असतें. म्हणून त्यांतून जर मुक्त व्हावयाचें असेल तर त्यांचा सतत त्याग केला पाहिजे. पण तसेंच स्वतःच्या ठिकाणच्या दोषांचा आणि अशुद्ध प्रवृत्तींचा सतत विचारहि करीत बसणें बरोबर नाहीं. त्यापेक्षां स्वतःस जसें बनावयाचें आहे त्यावर, तुमच्या ध्येयावर चित्त अधिक एकाग्र करा आणि त्याचबरोबर आपण डोळ्यापुढें ठेवलेलें ध्येय प्राप्त झालेंच पाहिजे आणि होईलहि अशी श्रद्धा बाळगा.

सतत स्वतःच्या दोषांचें आणि स्वतःच्या ठिकाणच्या गैर घटनांचें निरीक्षण करीत राहिल्यानें मन निराश होतें व श्रद्धा डळमळते. स्वतःच्या आसपासच्या अंधाराचा विचार कमी करून आगामी प्रकाशाकडे अधिक दृष्टि ठेवा. श्रद्धा, प्रसन्नता, अंतिम विजयासंबंधीं विश्वास

याच गोष्टी साधकांच्या प्रगतीस साह्यकर होत असतात––त्यायोगें साधनेंतील प्रगति अधिक सुकर व अधिक शीघ्र होते.

तुम्हांला जे चांगले अनुभव येतात त्यांना अधिक महत्त्व द्या. साधनमार्गावर होणारे प्रमाद व पदस्खलन यांपेक्षां, अशा प्रकारचा एक चांगला अनुभव हा अधिक महत्त्वाचा आहे. पण जेव्हां असा चांगला अनुभव येण्याचा थांबतो तेव्हां त्याबद्दल हुरहुर वाटूं देऊं नका, निराश होऊं नका, तर आंतून शांत रहा आणि असा चांगला अनुभव बलवत्तर स्वरूपांत पुनरपि लाभावा म्हणून अभीप्सा ठेवा; म्हणजे त्याचा परिणाम चांगला अनुभव खोलवर रुजण्यामध्यें व अधिक परिपूर्ण होण्यांत होईल.

सतत अभीप्सा करीत रहा; पण अधिक अचंचल मनानें. अगदीं साधेपणानें आणि समग्रतया भगवंतासमोर मोकळें होऊन आकांक्षा धरा.

* * *

मानवी अस्तित्वांतील 'प्राण' या भागाचा जो खालचा थर (Lower Vital) तो पुष्कळ व्यक्तींच्या ठिकाणीं गंभीर स्वरूपाच्या दोषांनीं व कुप्रवृत्तींनीं युक्त असून विरोधी शक्तींना तो साथ देतो. आपला आंतरात्मा दिव्य प्रभावासाठीं सतत उन्मुख ठेवणें, विरोधी शक्तींचा अखंडपणें त्याग करणें, विरोधी शक्तींकडून येणाऱ्या सूचनांपासून स्वतःस अलिप्त ठेवणें आणि श्रीमातेच्या शक्तींपैकीं स्थिरता, प्रकाश, शांति आणि पवित्रता यांचा प्रवाह आपणांमध्यें स्वीकारणें, या गोष्टी केल्या तर आपलें शरीरयंत्र या विरोधी शक्तींच्या तावडीं-तून शेवटीं सुटेल.

अचञ्चलतेची, अधिकाधिक अचंचलतेची आवश्यकता आहे. तसेंच अदिव्य शक्तींचे स्वतःवर होणारे परिणाम म्हणजे स्वतः आपण नव्हे; ते बाहेरून आंत घुसले आहेत असें पाहून त्या-पासून स्वतःस विभक्त करावयाचें, त्यांना नकार देऊन दिव्यशक्तीच्या कार्यकर्तृत्वावर स्थिर स्वरूपाचा विश्वास टाकावयाचा, या गोष्टींचीहि आवश्यकता आहे. जर तुमच्या ठिकाणचा आंतरात्मा भगवंताची मागणी करीत असेल, मन प्रामाणिक असेल व निम्न प्रकृतीपासून आणि साऱ्या विरोधी शक्तींपासून मुक्त होण्याची त्यांची इच्छा असेल, आणि जर तुम्ही आपल्या हृन्मंदिरांत जगन्मातेच्या शक्तीस आवाहन करूं शकत असाल, स्वतःच्या सामर्थ्यापेक्षां या दिव्य शक्तीवर अधिक विसंबून राहूं शकत असाल, तर शेवटीं विरोधी शक्तींचा वेढा दूर करतां येईल आणि त्यांच्याजागीं सामर्थ्य व शान्ति येईल.

* * *

निम्नतर प्रकृति अज्ञानी व अदिव्य असून ती स्वतः दिव्यतेस विरोध करीत नसली तरी दिव्य प्रकाश आणि दिव्य सत्य यांना ती पराङमुख असते. या विरोधी शक्ती केवळ अ-दिव्य नसतात; तर दिव्यताविरोधी असतात. अशा विरोधी शक्ती साधकाच्या ठिकाणच्या निम्नतर प्रकृतीचा उपयोग करतात, तेथें विकृति निर्माण करतात. निम्नतर प्रकृतीचें

सारें क्षेत्र कुप्रवृत्तींनीं व्यापून टाकतात आणि असें करीत करीत मनुष्यावर परिणाम करतात. इतकेंच नव्हे, तर त्याच्या ठिकाणीं प्रवेश मिळविण्याचा आणि त्याच्या अस्तित्वाचा ताबा घेण्याचा प्रयत्न करतात अथवा निदान त्याच्यावर संपूर्णतया नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतात.

अतिशयित आत्मनिंदा आणि पाप, अडचण अथवा अपयश यांच्या भावनेनें निराश होण्याच्या संवयीपासून संपूर्णतः मुक्त रहा. अशा भावनेनें साधनेस खरी मदत होत नाहीं. उलट ती मार्गातील एक मोठी अडचण असून तिनें प्रगतीस मोठाच व्यत्यय येतो. या गोष्टींचा अंतर्भाव धार्मिक वृत्तींत होतो. यौगिक मनोवृत्तीशीं त्यांचा संबंध नाहीं. स्वभावांतील दोष साऱ्या मानवतेच्या ठायीं सर्वसामान्यपणें दिसून येणारे असून ते निम्नतर प्रकृतीनें निर्माण केलेले असतात, असें योग्यानें मानावयास हवें; आणि मग स्थिर, खंबीर व प्रयत्नसातत्यशील अशा मनानें दिव्यशक्तीवर संपूर्ण विश्वास टाकून दुबळेपणा, निराशा अथवा अवहेलना याचा अवलंब न करतां आणि अस्वस्थ, उतावीळ किंवा क्रुद्ध न होतां, त्या गोष्टींचा त्याग करावयास हवा.

—श्रीअरविंद

'योगाचा पाया' मधून

Sri Aurobindo : Bases of Yoga : Pages 48-53

# श्रीअरविंद वाङ्मय

( क्रमशः )

## माता

**'माता'** (The Mother) हें पुस्तक आकारानें अगदींच लहान असलें तरी श्रीअरविंदांच्या योगविषयक वाङमय-प्रासादाची मुख्य किल्ली त्यांत आहे. कारण, मानवी जीवनाचें दिव्य-जीवनामध्यें रूपांतर करणें हें जें श्रीअरविंदांच्या योगाचें महान् ध्येय आहे, त्या ध्येयप्राप्तीसाठीं आवश्यक असलेल्या साधनेच्या भिन्नभिन्न भूमिका व प्रत्यक्ष साधनाक्रम यांचें सविस्तर विवेचन त्यांत केलेलें आहे.

हें ध्येय खरोखरीच प्रचंड आणि बिकट आहे; केवळ मानवी प्रयत्नानें तें साध्य होणें शक्य नाहीं. जी दिव्य भागवती शक्ति या विश्वामध्यें कार्य करीत आहे, स्वतः निर्मिलेल्या या सृष्टीचें, स्वतःच्या हेतुपूर्तीसाठीं जी शक्ति अधिशासन करीत आहे तीच केवळ हें महान् ध्येय साध्य करूं शकेल. म्हणून तिलाच प्रथम आवाहन करून तिच्या हातीं आपली साधना सुपूर्त केली पाहिजे. अर्थात् कांहीं विशिष्ट गोष्टींची अनुकूलता असेल तरच ही सर्वोत्तम शक्ति, साधकाची साधना प्रगतिपथावर राखण्याचें काम करते.

प्रथमतः साधकाचे ठिकाणीं **सत्यासाठीं अभीप्सा,** आकांक्षा पाहिजे. नुसती आकांक्षा आहे येवढ्यानें भागणार नाहीं; ती आकांक्षा अत्यंत तीव्र पाहिजे; तुमच्या जीवनाचीं सारीं अंगें

तिनें हळुहळु अधिकाधिक व्यापून टाकलीं पाहिजेत; इतकीं कीं, त्यामुळें, भगवत्‌शक्तीनें आविर्भूत व्हावें म्हणून तुमच्या सर्वांगांतून आवाहनाची जिवंत ज्वाला अविरत धगधगत राहिली पाहिजे. आपल्या ठिकाणीं त्या दिव्य शक्तीचें कार्य सुरू व्हावें, ती आपल्या ठिकाणीं आविर्भूत व्हावी म्हणून तुमच्या सर्वांगांनीं जणुं टाहो फोडला पाहिजे.

या जागृत ज्वलंत आकांक्षेबरोबरच, उच्चतर शक्तीला तुम्हीं **'समर्पण'** करावयास शिकलें पाहिजे. ईश्वरी इच्छाशक्ति आणि ईश्वराची आज्ञा शिरसावंद्य मानून नतभावानें तुम्ही तुमच्या साऱ्या गति-वृत्ती एकवटून त्या ईशशक्तीच्या स्वाधीन केल्या पाहिजेत. तुमचें समर्पण सक्रिय आणि सहकार्य-तत्पर असलें पाहिजे; निष्क्रिय वा तमगुणप्रधान असतां कामा नये. तसेंच, भगवंताच्याच कार्यासाठीं केवळ तुम्हीं स्वतःस खुलें राखलें पाहिजे; दुसऱ्या कोणत्याहि शक्तीचा प्रभाव स्वीकारतां कामा नये. एका बाजूनें तुम्हीं भगवच्छक्तीस आवाहन केलेंत आणि त्याचवेळीं तुमच्या ध्येयभूत सत्याला विरोधी असलेल्या शक्तींना व गति-वृत्तींना तुमच्या ठिकाणीं वाव दिलांत तर तुमचें उद्दिष्ट साध्य होणार नाहीं. जें जें कांहीं सत्यास व प्रकाशास पराङ्मुख असेल त्याचा क्षणोक्षणीं व पावलोंपावलीं **त्याग**, अस्वीकार व्हावयास पाहिजे, त्यास प्रतिकार केला पाहिजे. हा त्याग सर्वांगांनीं केलेला असला पाहिजे. असत्य आणि अज्ञान यांचा कधींच स्वीकार करतां कामा नये; नव्हे, तुमच्यामध्यें त्यांच्याविषयीं कुठेंच यत्किंचितहि सहानुभूति सुद्धां असतां कामा नये.

अभीप्सा, त्याग आणि समर्पण ह्या त्रिविध यत्नांची तुमच्याकडून अपेक्षा आहे. भगवंताची शक्ति वास्तविक तुमच्या ठिकाणीं साधना करीत असते, तुमच्या ठिकाणची साधना चालवीत असते; हें खरें असलें तरी जोपर्यंत कनिष्ठ पातळीवरील तुमच्या सामान्य प्रकृतीचे तुम्ही गुलाम आहांत तोंपर्यंत तुमचा वैयक्तिक प्रयत्न आवश्यकच आहे. ह्या प्रकृतीवर विजय मिळविण्याचा, ही प्रकृति ओलांडण्याचा तुम्हीं आटोकाट प्रयत्न केलाच पाहिजे. जसजसें तुम्ही या सामान्य प्रकृतीच्या अतीत जाऊन स्वतःला उच्चतर शक्तीच्या स्वाधीन करूं शकाल, तसतशी तुमच्या वैयक्तिक प्रयत्नांची जागा दिव्य शक्तीच्या कार्यानें घेतली जाईल. अर्थात् ही शक्ति, भगवंताची कृपा, तुमच्या ठिकाणीं काय काय अद्‌भुत परिणाम घडवून आणील त्याला सीमाच नाहीं. फक्त तुमच्या बाजूनें अविचल श्रद्धा, नितांत निष्ठा आणि सर्वतोपरि समर्पण या गोष्टींची अपेक्षा आहे एवढेंच. ह्या गोष्टी तुम्ही जितक्या पूर्णतेनें कराल तितकेंच दिव्य-शक्तीचें संरक्षणहि तुम्हांस अधिक मिळेल व तुमची प्रगतीहि निश्चित होईल.

स्वतःच्या ठिकाणीं असलेल्या भगवंताच्या उपस्थितिविषयींच केवळ नव्हे तर सर्वत्र उपस्थित असलेल्या भगवंताविषयीं जो जागृत असेल तोच खरा आदर्श साधक. मुळांत सर्व कांहीं भगवंतच असलें तरी अज्ञान आणि असत्य यांच्या आधिपत्यापासून तें भगवंतासाठीं जिंकून पुनः परत मिळवावयाचें आहे. दैवी शक्तींपैकीं सर्वांत अधिक अपहरण झालेल्या व सर्वांत अधिक दुरुपयोग केल्या गेलेल्या जर कोणत्या शक्ती असतील तर त्या धन, सत्ता व काम विकार होत. पूर्णयोगाच्या साधकानें या शक्तींचा त्याग केला पाहिजे असें नाहीं, तर परिश्रमपूर्वक त्यांना आसुरी शक्तींपासून जिंकून पुनः भगवंताच्या कार्यास लावावयाचें आहे.

मात्र वासना आणि आसक्ति यांचा वाराहि तुम्हांस लागला नसेल, त्यांपासून तुम्ही पूर्ण मुक्त असाल, मनाची समता आणि अंतःकरणाची शुचिता तुम्हीं प्राप्त करून घेतली असेल तरच तुम्हाला हें सर्वकांहीं करतां येईल, एरवीं नाहीं.

भगवंताचें खरें सेवक व्हावयाचें असेल तर त्या व्यक्तीनें सामान्य मानवी व्यवहाराच्या प्रमुख प्रेरणांपासून— वासना, आणि अहंकार यांपासून —सर्वस्वीं मुक्त असणें आवश्यक आहे. दैवी चेतनेशीं, भगवंताच्या जाणिवेशीं ज्याचें संपूर्णतया तादात्म्य झालेलें आहे तोच खरा, पूर्ण कर्मयोगी; दिव्य-कर्म-कर्ता. पण असें सर्वांगीण तादात्म्य, आत्म-समर्पणाच्या प्रक्रियेचें परिणामस्वरूप, फल म्हणून, साध्य होत असतें. साधनेच्या प्रारंभकाळांत पूर्णयोगाचा साधक, त्याला दिलेलें काम भगवती मातेचें काम म्हणून करीत राहतो. वैयक्तिक लाभाची इच्छा तो ठेवीत नाहीं. मातेची सेवा करणें, तिच्या यज्ञवेदीवर आपल्या कर्मांची आहुती देणें यांतच त्याला आनंद असतो, यांतच त्याचें कर्मफळ असतें. तिचा आनंद हीच त्याची कृतार्थता. तिचा संतोष, हेंच त्याचें जीवितसाफल्य. यानंतर, आपण कार्य करीत आहों ही त्याची भावना हळुहळु मागें पडूं लागून शेवटीं त्या जागीं, आपण श्रीमातेच्या हातचें एक साधन आहों, ही भावना येते. श्रीमातेच्या ठायीं असलेली त्याची भक्ति वाढत जाऊन तिच्याशीं त्याचा आंतरिक संबंध इतका निकटवर्ति होतो कीं, प्रत्येक प्रसंगीं अंतस्थ मातेच्या समोर निवेदन करतांच आंतूनच तिचें प्रत्यक्ष मार्गदर्शन त्यास मिळूं लागतें. नुसतें मार्गदर्शनच नव्हे, तर त्यानुसार कार्य करावयास लागणारी शक्तिसुद्धां तत्काळ प्राप्त होते.

साधकाला अशी अनुभूति येऊं लागते कीं, त्याच्या सर्व आंतरिक शक्ती व कार्यशक्ती केवळ वाहनरूप आहेत. त्यांच्याद्वारां भागवत, दिव्य शक्तीच कार्य करीत आहे, तिचेंच कार्य होत आहे. श्रीमातेचें सान्निध्य आणि तिच्याशीं तादात्म्य जसजसें अधिकाधिक कार्यक्षेत्रें व्यापूं लागून घनिष्ठ होत जातें तसतशी, कर्ता, सेवक किंवा साधन ही साधकाची भावना जाऊन श्रीमातेचें आपण बालक आहों, खरोखर तिच्याच जाणिवेचा एक भाग आहोंत अशी त्याची भावना होते व तसा प्रत्यक्ष अनुभवहि त्याला येऊं लागतो. आपली प्रत्येक हालचाल, गति-वृत्ति ही तिचीच दिव्य हालचाल असल्याचा, जागृतावस्थेंतहि स्पष्ट अनुभव त्यास येतो. तिचें ज्ञान, शक्ति, व आनंद त्याच्याठायीं मूर्तिमान् होतात.

साधकानें जिला निःशेष समर्पण करावयाचें असतें आणि जी साधकाला संकटमय मार्गावरून आपल्या बाहूंमध्यें सुरक्षितपणें वाहून नेते ती दिव्य भगवती माता आहे कोण ? ती कशी असते, कशी दिसते ? कशी अनुभवास येते ? मानवी देहाच्या आधारामध्यें ती स्वतः कशी अवतरते ? अवतरून कसें कार्य करते ? 'माता' या पुस्तकाच्या शेवटच्या विस्तृत विभागांत श्रीअरविंदांनीं हें सर्व कांहीं अशा सामर्थ्यपूर्ण भाषेंत वर्णन केलें आहे कीं, खरोखरच 'मातृ-उपनिषद्' हें नांव या पुस्तकास सार्थ ठरेल. श्रीअरविंदांच्या प्रकाशमय दिव्य-दर्शनाकाशांतून विहार करीत येणाऱ्या या अद्वितीय गद्य-काव्यांत त्यांनीं, भगवती माता मानवाच्या मुक्तीसाठीं आणि पूर्णतेसाठीं जो आविष्कार घडविते आणि पृथ्वीवर जो सर्वोत्तमाचा साक्षात्कार घडविते त्याचें गूढ ज्ञान उकलून दाखविलें आहे.

एकमेव पुरुषोत्तमाची चित्-शक्ति हीच अखिल सृष्टीची जननी आहे. ब्रह्माच्या अव्यक्त स्थितींतून हीच दिव्य चित्-शक्ति अनंत जगतें व्यक्ततेस आणते, त्यांचें पालनपोषण करते, त्यांना त्यांचा मार्ग दाखविते,—माउलीप्रमाणें वात्सल्यानें परिपालन करते. अशा या जगन्मातेचा तीन प्रकारांनीं अनुभव येऊं शकतो, ती तीन प्रकारांनीं आविर्भूत होते, तीन भूमिकांत—अवस्थांत ती कार्य करते.

**विश्वातीत अवस्थेंत** सर्व जगतांच्या वर राहून ती अखिल सृष्टीचा सर्वोत्तमाशीं संबंध जोडते. स्वतःच्या चेतनेमध्यें सर्वोत्तमाला ती धारण करते. ज्या सत्यांचा आविष्कार करावयाचा असतो त्यांना आवाहन करून, हातीं घेऊन त्यांना आकार देते. अशा रीतीनें भगवंताशीं, आपल्या प्रभूशीं या शक्तीची ही विराट लीला चालूं असते.

**वैश्विक अवस्थेंत** ती विश्वामध्यें स्वतःचा विस्तार करते. निर्मिलेल्या विश्वाचा आत्मा आणि मूलतत्त्व या रूपानें ती व्यापून राहाते. तिच्याच उपस्थितिमुळें सर्वांना कांहींतरी अर्थ आहे, सर्वांना तिच्याचमुळें जीवन लाभतें; तिच्याच हालचालीनें त्यांना योग्य दिशा व गति मिळते.

**व्यक्तिगत अवस्थेमध्यें** ती तिच्या अस्तित्वाच्या विश्वातीत आणि विश्वगत स्थितीला मूर्त रूप देते आणि प्रत्येक व्यक्त वस्तूच्या आकारामध्यें भगवंताचा आविष्कार व्हावा म्हणून त्या अवस्थांतील शक्ति कार्यान्वित करते. असत्य आणि अंधःकार यांच्या गर्तेत बुडून गेलेल्या जगताचा उद्धार करून त्यांच्या दास्यांतून त्यांना मुक्त करण्यासाठीं अज्ञानमय जगांत ती देहधारण करून अवतरते.

भगवती मातेचीं असंख्य रूपें आहेत. तिच्या महोदधीप्रमाणें विशाल अस्तित्वाची विपुलता तिचीं अनेक व्यक्तिमत्त्वें अनंत रीतीनें प्रकट करीत असतात. त्यांपैकीं दिव्यज्ञान, दिव्य शक्ति व दिव्य आनंद या तत्त्वांमध्यें पूर्णत्वप्राप्ति मिळविण्याच्या नियत उद्दिष्टाप्रत विश्वाची जी उत्क्रांति चाललेली आहे तिच्याशीं विशेष रीतीनें संबंधित असलेल्या व त्या उत्क्रांतीमध्यें अविरत कार्यरत असलेल्या मातेच्या चार प्रमुख स्वरूपांचा श्रीअरविंदांनीं निर्देष केला आहे. **माहेश्वरी, महाकाली, महालक्ष्मी** आणि **महासरस्वति** हीं तीं तिचीं प्रधान रूपें होत.

दिव्यज्ञानाच्या असीम प्रदेशांत, सर्वांच्या वर **माहेश्वरी** अधिष्ठित असते. मानवाचा आत्मा आणि प्रकृति यांची ती दिव्यज्ञानामध्यें परिणति करते; त्यांना दिव्यज्ञानसंपन्न करते, आपल्या उच्चतम आकांक्षांना परमोच्च प्रकाशाच्या दीप्तीचें दर्शन घडविते.

**महाकाली** ही कर्तुमकर्तुं शक्ति आणि दिव्य संकल्प यांची मूर्ति आहे. सर्व विघ्नांचा विध्वंस करून मानवाची उच्च आकांक्षा आणि प्रयत्न यांना उत्तरोत्तर उच्च जाण्यासाठीं प्रचंड वेग प्रदान करणारी, दिव्य योद्धयाची ती शक्ति आहे.

**महालक्ष्मी** ही सृष्टींतील सकल सौंदर्य आणि सामंजस्य यांचा आत्मा आहे. तीच सुप्त अत्यानंदाचें जीवनांत आविष्करण करते आणि दिव्य आनंद धारण करण्यासाठीं साधकास पात्रता प्रदान करते.

निर्दोष कर्म व सर्वांगीण पूर्णत्वप्राप्तीची अक्षय क्षमता **महासरस्वति** स्वतःमध्यें धारण

करते. भगवती मातेच्या चार स्वरूपांपैकीं भौतिक प्रकृतीच्या सर्वांत जवळ अशी ती असल्यानें सुव्यवस्था, कार्यसंपादन, सुरचना यांविषयीं ती अधिक दक्ष असते; आणि हें सर्व ती सर्वांगीण समग्रतेनें पार पाडते.

भगवती दिव्य मातेच्या या चतुर्विध स्वरूपाच्या गुणधर्मांचे, त्यांच्या कार्यपद्धतींचे, त्यांच्या आविष्कारार्थ आवश्यकतांचे, मानवाप्रीत्यर्थ त्या करीत असलेल्या प्रेम आणि श्रमयुक्त अशा जीवनकार्याचें श्रीअरविंदांनीं केलेलें वर्णन, मंत्रशक्तीनें भारलेल्या सार्वकालिक आध्यात्मिक वाङमयाचा एक उत्कृष्ट नमुना आहे.

भगवती मातेच्या दुसऱ्याहि कांहीं शक्ती आहेत. परंतु त्या अधिक अव्यक्त व पार्श्वभूमीवर स्तब्ध अशा आहेत. या वरील चार शक्तींचें कार्य ज्यावेळीं येथें सुस्थिर व कायम स्वरूपाचें होईल त्याचवेळीं त्या अन्य शक्ती येथें आविर्भूत होऊं शकतील; त्यानंतरच अतिमानस पातळीवरील त्यांचें अतिमानवी कार्य शक्य होऊन केवळ त्यामुळेंच, मानवाची त्रिविधाबद्ध असलेली प्रकृति मुक्त होऊन तिला आत्म्याचें शक्तिशाली स्वातंत्र्य लाभेल.

असें हें परिवर्तन हें तुमचें उद्दिष्ट असेल, तर स्वतःला भगवती मातेच्या हातीं सर्वस्वीं सोंपवून द्या. तुमच्या अस्तित्वाच्या सर्वांगांत – आत्मा, मन, प्राण, यांमध्यें, एवढेंच नव्हे, तर शरीराच्या पेशीन् पेशीमध्यें, अणू अणूमध्यें–श्रीमातेच्या सान्निध्याविषयीं आणि तिच्या शक्तीच्या कार्याविषयीं नित्य निरंतर जागृत रहा; तिचा स्पर्श स्वीकारण्यास सदैव नमनीय, लवचिक व उन्मुख रहा; आज्ञापालनार्थ सदैव उत्सुक व तत्पर रहा. आपल्या सर्व हालचालींना तिच्या इच्छेनुसार आकार मिळावा म्हणून क्षणोक्षणीं अत्यंत आतुर असे तुम्ही रहा. असे राहिलांत तरच अज्ञानांधःकार आणि दुःख यांनीं गांजलेल्या या जगतांत सर्वोच्च सत्य, सर्वोच्च प्रकाश आणि आनंद आणतां येईल आणि मानवी प्रकृतीचें दैवी, अतिमानवी प्रकृतीमध्यें मौलिक रूपांतर घडवून आणतां येईल.

—मा. पुं. पंडित.

---

भावनाविवश नसण्यानें कांहीं बिघडतें असें मला वाटत नाहीं. खरें प्रेम, दिव्य प्रेम यांपासून भावनाविवशतेइतकी कोणतीच गोष्ट दूर नाहीं. CWM : Vol 16 : Page 173

★

निराश व उदास वाटणें हें नेहमींच अनुचित, असमंजसपणाचे असतें; व त्यामुळें कांहींच लाभ होत नाहीं. योगाचा अगदीं सूक्ष्मांत सूक्ष्म असा तो शत्रु आहे.

CWM : Vol 16 : Page 194 —श्रीमाताजी

★

# वाचकांचे प्रश्न

( वाचकांनीं आपआपले प्रश्न पाठवावेत. )

"पुढच्या जन्मामध्यें कोणते अनुभव घ्यावयाचे हें जर मनुष्याचाच आत्मा ठरवीत असेल तर कांहीं आत्मे दुखः, दारिद्र्य आणि आपत्ती यांचा अनुभव पत्करतात आणि इतर कांहीं आत्मे सुख, समृद्धि आणि भरभराट यांचा अनुभव घ्यावयाचें ठरवितात; असें कां? ही विशिष्टच निवड करण्यापाठीमागें कोणती प्रेरणा असते?"

विकासमार्गावरील स्वतःच्या प्रगतीसाठीं आत्मा देह धारण करीत असतो; आणि नाना अनुभवांच्या द्वारां हा विकास अथवा प्रगति होत असते. ज्या अवस्थेपर्यंत त्याचा विकास झाला असेल त्यापुढील विकासास विशेष आवश्यक असेच अनुभव तो निवडत असतो. अशा-रीतीनें, आत्मा जेव्हां पहिला देह सोडतो त्यावेळीं पुढच्या जन्मास आवश्यक असलेला व्यक्तित्वाचा सांचा, व्यक्तित्वाला विशिष्ट आकार मिळण्यासाठीं आवश्यक असलेल्या अनुभवांचे प्रकार तो निश्चित करतो. अधिक शीघ्रगतीनें व सुरक्षितपणें विकास व्हावा, गुप्त शक्ती आणि सामर्थ्यें यांची अधिक परिपूर्ण वाढ होण्यास संधि मिळावी म्हणून एकाद्या आत्म्यानें बुद्धिपुरस्सर अधिक अवघड व खडतर स्वरूपाच्या अनुभवांची निवड करणें अगदीं शक्य आहे. या ठिकाणीं एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, आपल्या बाह्य जाणीवेला ज्या गोष्टी दुःखपूर्ण व कष्टप्रद वाटतात त्या आपल्या आंतरात्म्याला तशाच वाटतील असें नाहीं, तशा वाटणारहि नाहींत कदाचित्. कारण आत्मा हा त्या अनुभवांचें सार ग्रहण करीत असतो. त्यांतील 'रस' तो सेवन करीत असतो आणि आपल्या वर्धमान् व्यक्तित्वामध्यें तो रस आत्मसात् करून घेत असतो. एकादा अनुभव सुखद आहे कीं दुःखद आहे यावरून आत्मा त्याची निवड करीत नाहीं, तर त्याच्या ऊर्ध्वगामी विकासमार्गामध्यें त्याच्या प्रगतीस, उन्नतीस साह्यभूत अशा प्रकारची परिस्थिति मुख्यतः तो निवडित असतो.

★

"आश्रमामध्यें राहून साधना करणें किंवा बाहेर राहून साधना करणें यांत कांहीं फरक आहे काय?"

आजकाल श्रीमाताजींनीं साधकांशीं असलेला प्रत्यक्ष निकट वैयक्तिक संबंध बऱ्याच प्रमाणांत कमी करून आंतरिक संबंधावर अधिक भर दिला आहे; असें असतांना आश्रमा-मध्यें योगसाधना केली काय किंवा बाहेर राहून केली काय, त्यांत काय फरक पडेल?"

हें त्या त्या व्यक्तीवर अवलंबून आहे. एकादी व्यक्ति तिच्या मध्यवर्ति आत्मकेंद्राविषयीं, आंतरात्म्याविषयीं कितपत जागृत झाली आहे, यावर या साधनमार्गात बऱ्याच गोष्टी

अवलंबून आहेत. कारण या आंतरात्म्याच्या द्वारांच साधना उत्तरोत्तर प्रगत होत असते. आंतरात्मा पूर्णपणें जागृत होऊन जीवनाचीं सर्व सूत्रें जर त्यानें आपल्या हातीं घेतलीं असतील, व्यक्तीच्या सर्व गति-वृत्तींवर, हालचालींवर नियंत्रण ठेवण्याइतका तो पुरोभागीं आला असेल, तर––निदान कांहीं प्राथमिक अवस्थेपर्यंत––एकाद्यानें आश्रमांत साधना केली किंवा बाहेर राहून केली तरी फारसा फरक पडणार नाहीं. पण ही अवस्था प्राप्त झाली नसेल किंवा कांहीं प्रमाणांत साध्य झाली असेल, तर मात्र गुरूच्या प्रत्यक्ष सान्निध्यांत, त्याच्या कृपाक्षेत्रांत, त्याच्या प्रभावाच्या वलयांत राहणें अधिक हितकर ठरतें. कारण त्याच्या साह्यानेंच फक्त आंतरात्म्याचा प्रभाव व प्रभुत्व सतत कार्यकारी आणि सतत वाढतें राखणें शक्य होतें. आंतरात्म्याशीं प्रस्थापित झालेला हा संपर्क किंवा संबंध वाढविण्याच्या व टिकविण्याच्या दृष्टीनें बाहेरच्या जगांतील परिस्थिति बहुधा अनुकूल नसते. त्या परिस्थितींत तो आच्छादिला जातो. आंतरात्म्याच्या जागृतीची ज्योत धूसर होते, मंदावते. सामान्य अज्ञानमय जीवनांत अनुभवास येणारे विविध संपर्क आणि विरोधी संस्कार हे, शक्ती क्षीण करणारे, वाढ खुंटविणारे व प्रगतीस रोधणारे असतात.

गुरूच्या सान्निध्यांत––याठिकाणीं श्रीमाताजींच्या सान्निध्यांत, त्यांच्या प्रभावाच्या परिसरांत––स्वाभाविकच परिस्थिति निराळी असते. श्रीमाताजींचें स्वतःचें एक तेजोवलय, प्रभावक्षेत्र आहे. भोंवतालच्या वातावरणामध्यें कांहीं मैलापर्यंत तें पसरलेलें आहे. श्रीमाताजींमधून बाहेर पडणाऱ्या आध्यात्मिक शक्ती आणि आनंदमय किरण यांनीं तें भारलेलें आहे. दौर्बल्य निर्माण करणारे, निःशक्त करणारे कोणतेहि संस्कार, त्यांच्या स्पंदनाच्या प्रभावामुळें, निष्प्रभ होऊन जातात आणि प्रत्येक ऊर्ध्वगमनशील आकांक्षेला प्रेरणा मिळते. अशा या वातावरणांत अनायासें आत्म्याच्या शक्ती फुलतात आणि चैतन्याचा स्वाभाविक आत्माविष्कार साधतो.

'श्रीमाताजींनीं बाह्य संबंध कमी केले आहेत' या विषयीं–बाह्य दृष्टीनें भेटीगांठीच्या रूपांतील संबंध श्रीमाताजींनीं कमी केले आहेत हें खरें आहे. पण 'व्यक्तिगत' संबंध जोडला जाणें किंवा त्यास संधि मिळणें ही गोष्ट पूर्वीइतकीच आजहि शक्य आहे. मनःपूर्वक प्रयत्न करणारास, मनःपूर्वक इच्छा, आकांक्षा बाळगणारास श्रीमाताजींच्या ठिकाणीं मूर्तिमान् झालेली भगवच्छक्ति केव्हांहि प्राप्य आहेच. गाढ भक्ति, प्रेम आणि समर्पण यांतून उद्‌भूत झालेलें आंतरिक नातें प्रस्थापित होणें केव्हांहि शक्य आहे. वास्तविक हेंच नातें खरें वैयक्तिक व प्रत्यक्ष नातें म्हणतां येईल. हा आंतरिक संबंध निर्माण झाला नसतांना केवळ बाह्यदृष्टीनें कितीहि वेळां श्रीमाताजींची भेट झाली तरी त्यानें कांहीं साध्य होणार नाहीं. तो खरा संबंधच नव्हे.

★

**"आश्रमामध्यें ज्या प्रकारचें जीवन बहरलेलें आहे, विकसित झालें आहे, त्या प्रकारची सामूहिक जीवन-रचना आश्रमाबाहेर निर्माण करणें शक्य आहे काय ?"**

आश्रमासारखी परिस्थिति बाहेर निर्माण केली तर त्यांतून असें जीवनहि निर्माण झालें पाहिजे व होईलहि.

श्रीअरविंदांच्या ध्येयमार्गाचें अनुसरण करणाऱ्या, संपूर्ण समर्पणाच्या भावनेनें एकत्र आलेल्या साधकांची पुरेशी संख्या असेल, श्रीमाताजींच्या ठिकाणीं कार्यकारी झालेल्या अति-मानस महाशक्तीपासून जर ते सर्व साधक स्फूर्ति व मार्गदर्शन घेत असतील, वैयक्तिक दृष्टीनें आणि सामूहिक रीतीनेंहि या योगाचें परिपालन करीत असतील, तर या आश्रमासारखेंच सामूहिक सुसंवादी जीवन बाहेरहि विकसित होणें शक्य आहे.

ठिकठिकाणच्या श्रीअरविंद-केंद्रांकडून आणि मंडळांकडून हीच अपेक्षा आहे. कांहीं काळा-नंतर श्रीअरविंद केन्द्रें व मंडळें यांच्या कार्यास असेंच परिणत स्वरूप यावें अशी अपेक्षा आहे.

—रेवान्.

---

# साहित्य-सत्कार

**१ पोहोण्याचा–छंद किं. १॥ रु., २ सूर्योपासना आणि प्राणायाम–किं. २ रु. ३ गृहवैद्य अथवा क्षारचिकित्सा–किं. ३॥ रु. ४ सूनबाईचा बटवा–किं. २ रु. लेखक–र. कृ. गर्दे गोरेवाडी, २६ मोगल लेन, माहीम, मुंबई नं. १६.**

डॉ० र० कृ० गर्दे यांनीं लोकशिक्षणाचा पवित्र उद्देश मनांत ठेवून प्रसिद्ध केलेलीं हीं चारीं पुस्तकें कुटुंबांतील आरोग्यरक्षण व रोगनिवारण या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त आहेत. त्यांतील विवेचन सुस्पष्ट, भाषा सुलभ व माहिती भरपूर आहे.

**पोहोण्याचा व्यायाम** हा सर्वोत्कृष्ट आहे याबद्दल दुमत नसलें तरी त्याविषयीं शास्त्रीय माहिती असणें जरुरीचे आहे. पोहण्याच्या निरनिराळया पद्धती, त्याचे फायदे, अपघात, पोहो-ण्याच्या स्पर्धेकरतां लागणारी सविस्तर माहिती देऊन तें कार्य या पुस्तकानें साधलें आहे.

**सूर्यनमस्कार** आणि **प्राणायाम**, हा सर्वांगीण उन्नतीचें साधन म्हणून सर्वत्र मान्यता पावलेला व्यायाम आहे. त्यावरील स्वानुभवयुक्त व सांगोपांग माहिती दिलेलें हें पुस्तक आबालवृद्धांना मार्गदर्शक असून, वैयक्तिक व सामूहिक रीतीनें त्याचा प्रसार झाल्यास समाजा-चें कल्याण होईल.

आरोग्यरक्षणाचा प्रयत्न करूनहि प्रसंगवशात् कुटुंबांत रोगाचा प्रवेश होतो. नेहमींच डॉक्टर वैद्याकडे धांवणें हें गैरसोयीचें आणि आर्थिक दृष्टीनेंहि कठीण असतें. त्या दृष्टीनें घरबसल्या १२ क्षारांचा उपयोग करून रोगमुक्त होण्याचा उपाय **'गृहवैद्य'** मध्यें सुचविला

आहे. बालरोग, स्त्रीरोग, पुरुषरोग, त्यावरील पथ्यापथ्य यांचें विवेचन स्वास्थ्यरक्षणास उपयुक्त आहे.

'कृत्रिमता हेंच मानवी जीवनांतील अनेक दुःखांचें मूळ आहे.' त्या दृष्टीनें **'सूनबाईचा बटवा'** यामधील निसर्गोपचार, लंघन, जलचिकित्सा, बस्ती , योगासनें हीं मार्गदर्शक आहेत.

या सर्वच पुस्तकांत ठिकठिकाणीं आंकडेवारी, तक्ते व चित्रें दिल्यानें विषय समजण्यास अधिक सुलभ झाला आहे. सर्व पुस्तकें संग्राह्य आहेत.

★

**पुनर्जन्माचा सिद्धांत व त्याचें विवरण**—ले. रा० स० भागवत. किं. २ रु. पृ. १६०. थिऑसॉफिकल लॉज. पुणें. ४.

देव आहे कीं नाहीं, मृत्यूनंतर पुनर्जन्म होतो कीं नाहीं, या विषयावर वादविवाद करण्याचे दिवस गेले असें म्हणण्याइतक्या या गोष्टी आतां सर्वमान्य झाल्या आहेत. पुनर्जन्माचा सिद्धांत सिद्ध करण्यासाठीं हें पुस्तक नाहीं, असें लेखकानें प्रस्तावनेंतच म्हटलें आहे. येथें आहे पुनर्जन्मासंबंधींची विविध माहिती आणि थिऑसॉफिस्ट विद्वानांचे या विषयां-वरील संशोधनाचें सार. श्रीअरविंदांसारख्या अधिकारी व्यक्तींच्या विधानांमुळें—टीपांमुळें—पुस्तक अधिक मौलिक झालें आहे. एकाबाजूस पुनर्जन्माचा स्वीकार करणाऱ्या हिंदुधर्मांतहि जसा 'भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः।' हा युक्तिवाद आढळतो, तसेंच इस्लाम वा ख्रिश्चन धर्मांतहि पुनर्जन्माचे निर्देष आहेत, हें लेखकानें पुस्तकाच्या सुरुवातीच्या प्रकरणांत दाखविलें आहे. थोडक्यांत म्हणजे नुसतें विषयाचें नांव वाचून पुस्तक दूर लोटलें नाहीं, तर बरीच उपयुक्त माहिती मिळेल. लेखकाची भाषा ओघवती असून माहितीहि मनोरंजक व उद्बोधक आहे.

**मृत्यूनंतर काय ? हिंदुधर्म काय शिकवितो ?** ले० रा० स० भागवत किं. १॥ रु. पृ. १४५.

मृत्यूनंतर काय ? हा झाला एक यक्षप्रश्न. मृत्यू येईपर्यंत काय ? आजच्या या आणी-बाणीच्या व भीषण काळांत हीच खरी समस्या झाली आहे. तरीपण तो यक्षप्रश्न शिल्लक राहतोच. प्रस्तुत पुस्तकांत हिंदुधर्मांतील प्रमुख ग्रंथांचे या विषयावरील विचार एकत्रित करण्यांत आले आहेत.

ते थोड्याबहुत फरकानें सारखेच असल्यामुळें तोच तोचपणा जाणवतो पण हा कांहीं लेखकाचा दोष नाहीं. ७ व्या प्रकरणांत सर्व ग्रंथांचा सारांश देऊन लेखकानें वाचकांची मोठी सोय करून ठेवली आहे. थिऑसॉफिस्ट विद्वानांचे व हिंदुधर्मशास्त्रांचे या विषयावरील साम्यहि यांत दाखविण्यांत आलें आहे. जागोजागीं दिलेल्या सविस्तर टीपा, लेखकानें घेतलेल्या परि-श्रमाची साक्ष देत आहेत.

लेखकानें प्रांजळपणें कबूल केलें आहे कीं, वेदोपनिषदांतील या गहन विषयांवरील भाष्यें समजणें फार कठीण आहे; केवळ भाषा-पंडितांचा गैरसमज होण्याचाच अधिक संभव आहे.

बौद्धिक कसरत या दृष्टीनें या विषयाकडे पाहणाऱ्या जिज्ञासूंनीं ही सूचना अवश्य लक्षांत ठेवावी.

★

**भावरत्नें**—ले० दत्ताबाळ देसाई. चंद्रकांत शेटचे प्रकाशन मंदिर. कोल्हापूर-३. पानें २८ किं. ३७ न. पै.

दूरवरून केतकीच्या वनांतून येणाऱ्या सुगंधानें भारावून जावें तद्वतच, भावनामय प्रदेशांतून लहानग्या शब्दांवर आरूढ होऊन आलेलीं हीं रत्नें वाचकास विभोर करून सोडतात.

या रूपककथांच्या चित्तवेधक व समर्पक कथनशैलीमुळें असा भास होतो कीं, जणुं काय अभीप्सा, भावनेच्या गगनांत भरारी मारून शब्दांच्या घरटयांत विसांवली आहे.

लेखकाचा प्रयत्न स्तुत्य आहे. पण अधिक प्रकाशमय अंतःप्रेरणेंत शिरून स्वानुभूतीनें घनीभूत झालेल्या तेजस्वी रत्नांची लेखकाकडून अपेक्षा आहे.

★

**Secrets of Indian Medicine**:--( By Dr. R. S. Agrawal Dr. Agrawal's eye Institute, 15 Daryaganj Delhi ) P. P. 173 Rs. 4.

रोग बरे करण्याच्या विविध पद्धतींमध्यें प्रत्येकींत सत्याचा अंश असून, विविध धर्मांप्रमाणें त्यांच्याद्वारां एकाच सत्याचें दर्शन घडत असतें. या सर्व पद्धतींचा समन्वय करण्याचा प्रयत्न या पुस्तकांत लेखकानें केला आहे. विविध चिकित्सापद्धतींचा गुणदोष-विचार करतांना, ईश्वर हा एक महान् धन्वंतरी आहे या सत्याचा लेखकाला विसर पडलेला नाहीं. मानवतेला व्याधींच्या कचाटयांतून कायमचेच मुक्त व्हावयाचें असेल तर, किंवा औषधें गुणकारी होण्याच्या दृष्टीनेंहि डॉक्टर आणि रोगी या दोघांनींहि या महान् धन्वंतरीची जाणीव ठेवली पाहिजे.

लेखक स्वतः एक नेत्रविद्याविशारद असल्यानें वात, पित्त व कफ यांचें आधुनिक भाषेंत स्पष्टीकरण करीत असतांनाच नेत्ररोगांची चिकित्सा व ते बरे करण्याच्या समन्वयात्मक पद्धती यांचें विवेचन आलें आहे. नेत्रवैद्यांबरोबरच सामान्य वाचकांसहि पुस्तक उपयुक्त आहे कारण नेत्र सुधारण्याच्या नाविन्यपूर्ण पद्धती डॉ० अग्रवाल यांनी दाखवून दिल्या आहेत.

★

The Mother of the Golden All- By Chinmoy. Sri Aurobindo Ashram, Pondicherry. P. 48 Rs. 1-4-0

सुसंवादी व पवित्र वातावरणांत मनुष्याच्या सुप्त शक्ती कशा बहरतात याचा प्रत्यय, श्रीमाताजींच्या विषयीं लिहिलेल्या या काव्यसंग्रहावरून येतो. कविता लहान लहानच, परंतु त्यांचा आशय मात्र थोर आहे. इंग्रजीचा प्रथम फारसा परिचय नसतांनाहि स्फूर्तीच्या प्रवाहांत जन्म पावलेले या कवीचे काव्यसंग्रह कौतुकास्पद आहेत.

★

# साधकांना पत्रें

**उद्धरेदात्मनात्मानं ..... ( अ. ५.५ ) आणि सर्वधर्मान् परित्यज्य ..... अहं त्वां सर्व-पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ ( अ. १८.६६ ) यांचा समन्वय कसा करावयाचा ?**

या दोन उक्तींमध्यें खरा विसंवाद नाहीं. गीतोक्त योगामधील दोन भिन्न भिन्न प्रक्रिया दाखविणारीं हीं दोन वाक्यें आहेत. निःशेषतया आत्मसमर्पण हा त्याचा अंतिम श्रेष्ठ परिणाम, कळस आहे. कोणासहि प्रथम आपली स्वतःची हीन प्रकृति जिंकावी लागते. दिव्य प्रकृतीप्रत पोहोंचलेल्या उच्चतर स्व-च्या साह्यानें, सामान्य, हीन गति-प्रवृत्तींच्या भोंवऱ्यांत सांपडलेल्या स्व-ला बाहेर काढावें लागतें. पण त्याचबरोबर आपलीं सर्व कर्में, सर्व कृती, अंतरंगामध्यें चाल-लेली योगाची प्रक्रियाहि सर्वान्तर्यामी, सर्वातीत पुरुषोत्तमाचे चरणीं यज्ञभावानें समर्पण करीत रहावयाचें असतें. जेव्हां मनुष्य सामान्य स्व-मधून उच्चतर स्व-पर्यंत पोहोंचतो व तेथें स्थि-रावतो, जेव्हां मनुष्याला ज्ञान होतें व तो मुक्त होतो त्याचवेळीं मग 'सर्व धर्मांचा' त्याग करून तो दिव्य जाणीव, दिव्य संकल्प, दिव्य शक्ति व दिव्य आनंद यांच्या आधारें जीवन व्यतीत करूं लागतो व सर्वभावानें पूर्णांगांनीं परमेश्वराचे चरणीं स्वतःचें समर्पण करतो.

गीतोक्त योगांतील आवश्यक त्या सर्व अंगांचा समावेश आपल्या पूर्णयोगांत असला तरी पूर्णयोग व गीतोक्त योग एक नव्हेत. आपल्या योगामध्यें आपण पूर्ण-समर्पणाची भावना, संकल्प व अविरत आकांक्षा पायाभूत धरून साधनेस प्रारंभ करतो. पण त्याचबरोबर हीन प्रकृतीचाहि आपणांस त्याग करावयाचा असतो. तिच्या बंधनांतून आपली जाणीव मुक्त करावयाची असते. उच्च, दिव्यतर प्रकृतीच्या स्वातंत्र्यानें युक्त अशा श्रेष्ठ स्व-च्या साह्यानें हीन प्रकृतीच्या चक्रव्यूहांत अडकलेल्या 'स्व'चीहि मुक्तता करावी लागते. ही दुहेरी प्रक्रिया आपण केली नाहीं तर आपल्या हातून यत्नशून्य व तपस्या-विमुख असें तामसिक, अतएव मिथ्या समर्पण होण्याचा धोका असतो. अर्थात् त्यायोगें प्रगतीहि थांबते; किंवा असेंहि होण्याचा संभव असतो कीं, खऱ्या परमेश्वराला समर्पण न घडतां, आपणच निर्माण केलेल्या खोटचा, काल्पनिक अशा दिव्यतेच्या आभासमय मूर्तीला आपण राजसिक समर्पण करूं लागतो व त्या मूर्तीमागें आपला राजसिक 'अहं' किंवा त्याहिपेक्षां हीन असें कांहीं तरी दडलेलें असतें.



★

परोपकार हें आपल्या योगाचें खरें उद्दिष्ट नाहीं. आपलें खरें उद्दिष्ट आहे परमेश्वर प्राप्ति. दिव्य चेतनेमध्यें प्रवेश करून अ पला खरा अस्तित्वाधार ( अहं नव्हे ) परमेश्वरा-मध्येंच असल्याचा अनुभव घेणें हें आपलें खरें उद्दिष्ट आहे.

दमनानें षड्रिपु जिंकता येणार नाहींत. ( समजा, कांहीं प्रमाणांत त्या मार्गानें यश

लाभलें तरी ते फक्त दडपले जातील, त्यांचा नाश होणार नाहीं. ) उलट, पुष्कळ वेळां दमनानें त्यांचें सामर्थ्यच वाढलेलें आढळतें. त्यांना जिंकावयाचें तर प्रथम दिव्य चेतनेनें अहंप्रधान प्रकृतीमध्यें प्रवेश करून तिचें परिवर्तन घडविलें पाहिजे व त्या द्वारां षड्रिपूंचें शुद्धीकरण झालें पाहिजे.

अंतःकरणाच्या अगदीं खोल खोल तळापासून त्यानें स्वतःस या मार्गास वाहून घेतलें व या मार्गावर तो निरतिशय चिकाटीनें यत्न करीत राहिला तरच केवळ तो यशस्वी होऊं शकेल.

*

जोंवर आपण सांप्रतच्या लोकाच्याच जाणीवेमध्यें—जगत्-जाणीवेमध्यें—वास करूं, तोंवर गीतेंत वर्णिल्याप्रमाणें हें जग अनित्यमसुखम् आहे. तिकडून तोंड फिरवून परमेश्वराकडे वळून दिव्य जाणिवेंत प्रवेश केल्यानेंच केवळ, मनुष्य या जगांत राहूनहि अनादिअनंताची प्राप्ति करून घेऊं शकेल. SABCL : Vol 22 : Page 70

*

पुष्कळ विषयांच्या बाबतींत गीतेची भाषा पुष्कळदां विरोधाभासात्मक दिसते; कारण वरवर परस्पर विरोधी दिसणाऱ्या दोन सत्यतत्त्वांचा स्वीकार करून त्यांचा समन्वय साधण्याचा गीतेंत प्रयत्न आहे. संसार-परित्याग होऊन ब्रह्मलीन होण्याची शक्यता गीतेनें मान्य केली आहे आणि शिवाय परमेश्वराचे ठिकाणीं—'मजमध्यें'—राहून या जगांत जीवन्मुक्त म्हणून व्यक्ति व्यवहार करूं शकते हेंहि, गीतेनें विशेष प्राधान्य देऊन प्रतिपादलें आहे. यावरच तिचा सर्वांत अधिक भर आहे असेंहि म्हणतां येईल. श्रीरामकृष्णांनींहि सिद्धांच्या अशाच दोन कोटी सांगितल्या आहेत. ईश्वर कोटींतील सिद्ध, जीवकोटीहून अधिक उच्च दर्जाचे असून ते उच्चतर पातळीवर चढत चढत परमेश्वराशीं तादात्म्य पावून त्या आनंदासह व सामर्थ्यासह पुनः खालीं उतरून दिव्य कर्म करीत या जगांत राहूं शकतात; पण हें सामर्थ्य जीवकोटीच्या सिद्धांमध्यें नसतें. ते परमेश्वराप्रत जाऊन त्याच्याशीं तादात्म्य पावल्यावर परत येऊं शकत नाहींत. संपूर्ण सत्याचा वास आहे अतिमानसिक जाणिवेमध्यें. तेथें स्थिर होऊन, तेथून जीवन व जड जगत् यांवर प्रभाव पाडून कार्य करणें हेंच पूर्णरूपानें सत्याचें सामर्थ्य व्यक्त करणें आहे.

—श्रीअरविंद

* SABCL : Vol 22 : Page 71

संपादक—भालचंद्र लिमये.
प्रकाशक—'संजीवन कार्यालय', श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी.
मुद्रक—श्रीअरविंद आश्रम प्रेस, पांडीचेरी.
583/58/7/850
**वार्षिक वर्गणी—यथाशक्ति.**

# दिव्य जीवन

## ग्रंथ–प्रकाशन–योजना

दिव्य जीवन ग्रंथाची छपाई सुरु झाली आहे. संजीवनच्या कांहीं वाचकांनीं विचारल्यावरून ग्रंथांतील विषयांची कल्पना येण्याकरतां पहिल्या खंडाची अनुक्रमणिका देत आहोंत. प्रसिद्धीपूर्वी रु.२५ भरून होणाऱ्या ग्राहकांची नोंद चालू आहे.

### –अनुक्रमणिका–


१ मानवी आकांक्षा
२ दोन नकार – जडवादी नकार
३ दोन नकार – संन्यासी नकार
४ सत्य सर्वव्यापी आहे
५ व्यक्तीची नियति
६ विश्वांत मानवाचें स्थान
७ अहम् आणि द्वंद्वें
८ वेदान्ती ज्ञानाचे मार्ग
९ शुद्ध सद्वस्तु
१० चिन्मय शक्ति
११ अस्तित्वाचा आनंद – प्रश्न
१२ अस्तित्वाचा आनंद – उत्तर
१३ दैवी माया
१४ अतिमानस (विज्ञान) हें सृष्टीची उभारणी करतें.
१५ परात्पर सत्य–संविद्
१६ अतिमानसाच्या तीन अवस्था
१७ दिव्य आत्मा
१८ मानस व अतिमानस
१९ प्राणशक्तिमय जीवन
२० मृत्यु, वासना व असामर्थ्य
२१ जीवनाची ऊर्ध्वगति
२२ जीवनाचा प्रश्न
२३ मानवांतील दोन आत्मे
२४ जडतत्त्व
२५ जडाची ग्रंथि
२६ चढती तत्त्वमालिका
२७ अस्तित्वाच्या सात तारा
२८ अतिमानस, मानस आणि अधिमानसी माया



## संजीवन कार्यालय

### श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी